follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।



पवारांनी शेताच्या बांधातच रहावं, शेजारचा देवाचा बांध रेटू नये!

वृत्त पान ३ वर...

RNI Regd. No. 72105/99 ❊ वर्ष २५ ❊ अंक २२२ ❊ सातारा ❊ शनिवार, दि. २० एप्रिल २०२४ ❊ पाने ६ (सुप्रभात) ❊ किंमत ५/– रूपये

# शेतकऱ्यांबाबत केंद्र सरकारचे पाकीटमारीचे धोरण

## ज्येष्ठ नेते शरद पवार यांची टीका

**राजदंड / बारामती**

**भाजप सरकारने शेतकऱ्यांचा शेतीमाल स्वस्त केला, तर दुसऱ्या बाजूला इंधनाच्या किमती वाढवून इतर वस्तूंचे दर वाढविले, शेतकऱ्यांना वरच्या खिशात पैसे टाकुन दुसऱ्या खिशातून दुप्पट पैसे काढुन घेतले जातात.ही एक प्रकारची पाकीटमारी आहे.पाकीटमारीची पध्दत बंद करण्यासाठी निर्णय घेणाराला बाजुला करण्याची गरज असल्याची टीका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली.**



कन्हेरी (ता.बारामती) येथे बारामती लोकसभा मतदारसंघाच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार खासदार सुप्रिया सुळे यांच्या प्रचाराचा शुभारंभ पवार यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी पवार यांनी भाजप सरकारच्या धोरणावर टीका केली. अमित शहा नावाचे ग्रहस्थ मला हिशोब मागतात, गेल्या दहा वर्षात सत्ता कोणाची आहे, कोण मंत्री आहे असा सवाल करत पवार म्हणाले, मोदी फडवणीस यांच्यासह अन्य नेते आमच्या विरोधात घटना बदलण्याचा खोटा प्रचार सुरु असल्याचे सांगतात.मात्र, त्यांचेच मंत्री घटना बदलणार असल्याचे सांगतात.घटना बदलण्याचा विचार गंभीर आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला अधिकार महत्वपुर्ण आहे. त्यासाठी सर्वांनी जागरुक राहण्याची गरज आहे.

खा. सुप्रिया सुळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव न घेता त्या म्हणाल्या,काहीजण मला दहा वर्षात काय केलं,अशी विचारणा करतात.पण त्या दहा वर्षात तुम्ही पण सत्तेत होता.त्यावेळी महाविकास आघाडीचे सरकार होते.त्याच निधीतून आपण विकासकामे केली आहेत. विकास निधीचे पुस्तक विरोधकांना ‘ पॅकींग’ करुन पाठविणार आहे. त्यामध्ये सत्य तेच लिहीले आहे. त्यांनी ते वाचले नाही,तरी चाळावे. आपला पक्ष एक होता.सर्वांनी मिळुन काम केले.दिल्लीत मी,इथ तुम्ही काम करायचे असं ठरलेच होते ना,वयाचा नात्याचा, पदाचा सन्मान केला,असा टोला सुळे यांनी यांना लगावला.

यावेळी आमदार रोहित पवार यांनी त्यांच्याकडे नेते,तर आमच्याकडे निष्ठावंत आहेत.ही निवडणुक पवारसाहेब विरुध्द भाजप असल्याचे रोहित पवार म्हणाले.

यावेळी आमदार संजय जगताप,युगेंद्र पवार आदींचे भाषणे झाली.

यावेळी राजेंद्र पवार, सुनंदा पवार, श्रीनिवास पवार, शर्मिला पवार, श्रीनिवास पवार, रणजित पवार, सदाशिव सातव, जवाहर वाघोलीकर, आप्पासाहेब जगदाळे, सतीश खोमणे, ॲड. संदीप गुजर, एस. एन जगताप, पौर्णिमा तावरे, सत्यव्रत काळे आदी उपस्थित होते.

## थोडक्यात

### पुण्यात सलग चौथ्या दिवशी गोळीबार

**पुणे :** जुन्या वादातून सलग चौथ्या दिवशी पुण्यात गोळीबार झाल्याची घटना घडली. पुण्यातील येरवडा परिसरात आज पहाटे पुन्हा दोघांवर गोळीबार करण्यात आला. जुन्या वादाचा राग मनात धरून एकावर तीन गोळ्या झाडण्यात आल्या. आकाश चंदाले याने विकी चंदाले या दोघांवर गोळीबार केला. गोळीबार करणाऱ्या आरोपीना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. पहाटे साडेतीन ते चारच्या दरम्यान येरवडा येथील अग्रेसन स्कूल समोर हा प्रकार घडला. जुन्या भांडणाचा वाद होता. दोघेही एकमेकांचे नातेवाईक असल्याची माहिती आहे.

### महिलेच्या विनयभंग प्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी एकावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी रामा थोरात (रा. प्रतापसिंहनगर, सातारा) याच्या विरुध्द सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना दि. १६ एप्रिल रोजी घडली आहे. महिलेला अश्लील बोलून विनयभंग केला.

### ट्रक चालकाला लुटले; तीन अज्ञातांवर गुन्हा

**सातारा :** ट्रक चालकाला लुटून जबरी चोरी केल्याप्रकरणी अज्ञात तिघांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, त्रिपुटी खिंड ता.सातारा येथे थांबलेल्या ट्रक चालकाला लुटून अज्ञात तिघांनी जबरी चोरी केली. याप्रकरणी दीपेंद्र बहाद्दुर पुनमगर (३४, मूळ रा. नेपाळ सध्या रा.रहिमतपूर ता.कोरेगाव) यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

### मारहाण प्रकरणी चौघांवर गुन्हा

**सातारा :** एकास मारहाण केल्याप्रकरणी चौघांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, नवीन एमआयडीसी, सातारा येथे दिनकर काशीनाथ चव्हाण (वय ६२, रा. शिवराज पेट्रोलपंप परिसर, सातारा) यांना सोमनाथ चौगुले व अनोळखी त्याच्या तीन साथीदारांनी मारहाण केली.

## मंदार कोल्हटकर, धीरज पाटील यांचे अपघाती निधन

**राजदंड / सातारा**





पुणे-बेंगलोर महामार्गावर जोशीविहिर (ता. वाई) येथे झालेल्या भिषण अपघातात मंदार कोल्हटकर (वय ४५ रा. कोल्हटकर आळी, सातारा) व धिरज पाटील (वय ३८ रा. ढवळी ता. वाळवा जि. सांगली) हे जागीच ठार झाले. हे दोघे तरुण भारत संवादमध्ये वितरण विभागात कार्यरत होते.

मंदार कोल्हटकर व धिरज पाटील हे आपल्या दुचाकीवरुन रस्त्याच्या डावीकडून साताऱ्याच्या दिशेने येत होते. त्वयाचवेळी पुण्याहून कोल्हापूरकडे निघालेल्या विजय शहा (रा. मंगळवार पेठ, कोल्हापूर) यांच्या गाडीने त्यांना जोरदार धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की दोघेही उडून अतिशय दूर फेकले गेले. महामार्गाच्या बाजूला असलेल्या सीसीटीव्हीमध्ये ही घटना कैद झाली असून क्विड कार ही महामार्गावरील मधली लेन सोडून डाव्या लेनमध्ये येत हा अपघात झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. यावरुनच क्विड कार चालक अनियंत्रित असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

अपघाताची माहिती मिळताच सातारा जिल्हा रुग्णालय परिसरात तरुण भारत परिवारातील सदस्य, साताऱ्याच्या नाट्याक्षेत्रातील अनेक कलाकार यांनी गर्दी केली होती. साताऱ्याच्या नाट्या क्षेत्रातील मंदार कोल्हटकर यांचे योगदान होते. त्याने काही चित्रपट, मालिका, नाटके तसेच जाहिरातींसाठी अभिनय केला होता.

मंदार कोल्हटकर यांच्या पश्चात आई वैजंती, पत्नी मयुरा, दोन मुले मितेश आणि मिहीर असा परिवार आहे.

धीरज पाटील यांच्या पश्चात वडील बाळासो, आई उषाताई असा परिवार आहे.

## मराठी माणसांचे पक्ष भाजपने फोडले - जयंत पाटील

### चंद्रहार पाटील यांचा रॅली काढून अर्ज दाखला

**राजदंड / सांगली**

उद्धवजी ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महविकास आघाडीने विकासकामे उभारली, कोरोनात आधार दिला, दुष्काळात कर्जमाफी दिली, महापुरात मदत केली, महविकास आघाडीला रोखणे शक्य न झाल्याने सत्ता अखेर भजपने मराठी माणसाचे पक्ष फोडले असल्याचा आरोप राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केला.

महाविकास आघाडीचे उमेदवार शिवसेनेचे चंद्रहार पाटील यांचा उमेदवारी अर्ज आज भरण्यात आला, त्यानंतर स्टेशन चौक ते मारुती चौक रॅली काढण्यात आली, त्यानंतर मारुती चौक येथे रॅली समारोपावेळी ते बोलत होते.

यावेळी शिवसेना खासदार संजय राऊत, आमदर अरुण लाड, सुमनताई पाटील, शिवसेना संपर्कप्रमुख नितीन बानूगडे पाटील, शरद लाड, संजय विभूते आदी उपस्थित होते.

जयंत पाटील म्हणाले, “ चंद्रहार यांचे घराण्यात कोणीही राजकारणात नव्हते, अनिलभाऊ बाबर यांनी चंद्रहार पाटील यांना पहिल्यांदा जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राजकारणात आणले, दोनदा महाराष्ट्र केसरी हा किताब त्यांनी मिळवलेला आहे. कुस्तीमध्ये त्यांनी पूर्ण क्षमता त्यांनी दाखवली आहे. शिवसेनेने त्यांना उमेदवारी दिलेली आहे. पुढच्या काळात महविकास आघाडीचे सर्व नेते या प्रचारात येतील. उमेदवार म्हणून चंद्रहार पाटील सगळीकडे पोहचणार नाहीत, त्यामुळे आता कार्यकर्त्यांनी ही निवडणूक हातात घ्यावी.

■ **उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना जिल्ह्याला मदत**

जयंत पाटील म्हणाले, उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री असताना जिल्ह्याच्या पूर्व भागात ६५ गावांना अतिरिक्त ६ टीएमसी पाणी देण्याचा निर्णय उद्धवजी ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीने घेतला. सांगली जिल्ह्यातील टेंभू योजनेला देखील आपण चांगला निधी दिलेला आहे, शेजारच्या सातारा आणि सोलापूर जिल्ह्यात देखील



**“ महाराष्ट्रात संदेश गेलाय, एका शेतकऱ्याच्या मुलाला खासदार करायला सगळी महविकास आघाडी एकत्र आलेली आहे. सांगली जिल्ह्याला पैलवनांची परंपरा आहे. ऐतिहासिक मारुती चौकात आज सगळे माझ्या विजयाचे साक्षीदार झाला आहात. कुस्ती परंपरेत हरिनाना पवार, हिंद केसरी मारुती माने, संभाजीअप्पा पवार, माझे गुरू गणपतराव आंधळकर आदीनी राजकारणात चांगले काम केलं आहे. मी देखील त्याच मार्गाने काम करेन असा विश्वास देतो.**

**– चंद्रहार पाटील, डबल महाराष्ट्र केसरी**

त्याचा फायदा झाला आहे. सांगली जिल्ह्यातील ८२ हजार शेतकऱ्यांना कर्जमाफी उद्धवजी यांनी सत्ता येताच पहिल्या आठवड्यात घेतलेल्या निर्णयात दिली. सांगली जिल्ह्यात १३६ कोटी रुपयांची मदत पुरबधित गावांना केली. देशात ५० लाख लोक कोरोना मध्ये मयत झाले, ज्यामध्ये महाराष्ट्रात सर्वात कमी मृत्यू दर केवळ आमच्या सरकारमुळे राहू शकला, भाजपची सत्ता असणाऱ्या राज्यात मृतदेह नदीत फेकण्यात आले, अशी एकही घटना महाराष्ट्रात घडू दिली नाही. इतकं काम असल्यामुळं उद्धवजी यांचा पक्ष फोडला, त्यानंतर राष्ट्रवादी फोडली, तरीही महाराष्ट्रात जनता आजही उद्धवजी आणि शरद पवार यांच्या पाठीशी आहे. असा दावा जयंत पाटील यांनी केला.

■ **जयंत पाटील यांचे पुन्हा स्पष्टीकरण**

निवडणुकीच्या आधी तिकीट वाटपासाठी सोशल मिडियावरून सर्वांचा रोख माझ्यावर आहे, पण या निर्णयात मी कुठंही नाही. हा निर्णय काँग्रेस आणि शिवसेनेचा आहे. राष्ट्रवादीने ही जागा मागितली नव्हती. त्यामुळे आता निर्णय झालेला आहे. संजय राऊत हे एकदा निर्णय घेतला की ते कोणाचेही (पान ३ वर)

## पोलिसाने मारली निवडणूक कर्मचाऱ्याच्या कानशिलात

### औंध ठाण्यात गुन्हा दाखल; वाहन तपासणेवेळी प्रकार

**राजदंड / सातारा**

कराड ते विटा रस्त्यावर चोराडे फाटा येथे वाहनांची तपासणी करत असताना एका पोलीस कर्मचाऱ्याने शासकीय कर्मचाऱ्याच्या कानशिलात मारुन, धक्काबुक्की, शिवीगाळ केली. हा दि. १७ रोजी मध्यरात्री २.१७ वाजण्याच्या सुमारास घडला.

औंध पोलीस ठाण्यात पाटबंधारे विभागाच्या ओगलेवाडी, ता. कराड येथील टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभागातील लिपिक सुहास विलास गुरव (वय ३२, सध्या रा. बनवडी, ता. कराड, मूळ रा. कनेरीवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर) यांनी फिर्याद दिली आहे. या प्रकरणी पोलीस कर्मचारी अजय विलास माने (रा. म्हासुर्णे, ता. खटाव) याच्याविरोधात शासकीय कामात अडथळा आणणे, शिवीगाळ, मारहाणीचा गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादीत नमूद केले आहे की, स्थिर सर्वेक्षण पथक क्र. पाच हे कराड-विटा रस्त्यावर चोराडे फाटा या पॉईंटवर कामकाज करत होते. दि. १७ रोजी रात्री १२ ते सकाळी ८ वाजेपर्यंत सुहास गुरव, सहायक पथकप्रमुख सतिश कोकाटे, व्हिडीओग्राफर यश घार्गे, पोलीस शिपाई टिंगरे, होमगार्ड पिसाळ, घाडगे यांच्यासोबत संशयित वाहनांची तपासणी करत होते.

मध्यरात्री २. १७ वाजण्याच्या सुमारास एक चारचाकी गाडी (एमएच ११ डीएच ०४४९) थांबवली. ही गाडी तपासतेवेळी 'मी पोलीस आहे, ओळखपत्र दाखवू का, मी आमदार, खासदाराच्या गाड्या चेक करतो, तुमची लायकी आहे काय' असे म्हणून अजय माने याने हुज्जत घातली. तसेच मला घाणेरड्या भाषेत शिवीगाळ केली. पुन्हा हुज्जत घालून कानाखाली मारली. तो गाडी सुरु करुन निघून जाण्याचा प्रयत्न करत असताना गाडीची चावी सुहास गुरव यांनी काढून घेतली. त्यामुळे अजय माने याने पुन्हा गुरव यांच्या कानशिलात लगावली.

दरम्यान, गाडीची तपासणी केली असता त्यामध्ये काहीही संशयास्पद आढळून आले नाही. यावेळी पेट्रोलिंग करताना औंध ठाण्याचे पाटोळे तेथे आले असता त्यांच्यासमोरही माने याने शिवीगाळ, धक्काबुक्की केली. पोलीस उपनिरीक्षक अक्षयकुमार ठिकाने तपास करत आहेत.

## सराईत गुन्हेगाराने दिली तीन घरफोड्यांची कबुली

**राजदंड / सातारा**

पोलीस गस्त सुरु असताना अट्टल गुन्हेगाराला पकडल्यानंतर त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने तीन घरफोड्यांच्या गुन्ह्यांची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीचा मुद्देमाल जप्त केला.

जीवन शहाजी रावते (वय २४, रा.कोडोली, सातारा) असे अटक केलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १६ एप्रिल रोजी ही कारवाई करण्यात आली आहे. पोलीस गस्त घालत असताना त्यांना जीवन रावते हा दिसला. त्याच्याकडे वेल्डींग मशीन होती. पोलिसांनी त्याबाबत विचारणा केली असता त्याने ती चोरी केल्याचे समोर आले. यामुळे पोलिसांनी त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने याच वर्षात तीन घरफोड्या केल्याची कबुली (पान ३ वर)

## डीएसके यांच्या कार्यालयावर ईडीची छापेमारी; अधिकाऱ्यांची झाडाझडती

**राजदंड / पुणे**



ज्येष्ठ बांधकाम व्यावसायिक डी एस कुलकर्णी यांच्या जंगली महाराज रस्त्यावरील कार्यालयावर छापा घालून सक्तवसुली संचालनालयच्या पथकाने झाडाझडती घेण्यास सुरुवात केली आहे. ईडीच्या मुंबई येथील पथकाने आज पहाटेपासून ही कारवाई सुरू केली आहे.

डीएसके यांच्यावर गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. पुण्यातील अनेक पोलीस ठाण्यात त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणी त्यांना तब्बल पाच वर्ष तुरुंगाची हवा खावी लागली. सध्या ते जामीनावर बाहेर आले आहेत. डीएसके यांच्या कंपनीत गुंतवणूक केलेल्या तब्बल ३५ हजार गुंतवणूकदारांचे कोट्यावधी रुपये थकित आहेत. कंपनीच्या स्थावर मालमत्तांचा लिलाव करून गुंतवणूकदारांना त्यांचे पैसे परत करावे, असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. डीएसके यांच्या एकूण १९५ स्थावर मालमत्ता जप्त करण्यात आले आहेत.

## २१ राज्यांतील १०२ जागांवर ६३ टक्के मतदान

### त्रिपुरामध्ये सर्वाधिक ८०%, बिहारमध्ये सर्वात कमी ४८% मतदान; बंगाल-मणिपूरमध्ये हिंसाचार

**नवी दिल्ली :** लोकसभेच्या पहिल्या टप्प्यात २१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील १०२ जागांवर मतदान संध्याकाळी ६ वाजता संपले. जागांच्या दृष्टीने हा सर्वात मोठा टप्पा आहे. सायंकाळी ६ वाजेपर्यंत ६३ टक्के मतदान झाले होते. अंतिम मतदानाची टक्केवारी अद्याप आलेली नाही.



या टप्प्यात मणिपूरच्या दोन लोकसभा जागांवर (मणिपूर इनर आणि मणिपूर बाह्य) मतदान झाले. २६ एप्रिल रोजी बाहेरील जागांच्या काही भागांमध्येही मतदान होणार आहे. पहिल्या टप्प्यात १,६२५ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. यामध्ये १,४९१ पुरुष आणि १३४ महिला उमेदवार आहेत. ८ केंद्रीय मंत्री, एक माजी मुख्यमंत्री आणि माजी राज्यपालही यावेळी रिंगणात आहेत.

या टप्प्यानंतर दुसऱ्या टप्प्यातील मतदान २६ एप्रिल रोजी होणार आहे. एकूण ७ टप्प्यात ५४३ जागांसाठी १ जून रोजी मतदान होणार आहे. सर्व जागांचे निकाल ४ जूनला लागणार आहेत.

### महाराष्ट्रात सायंकाळी ५ वाजेपर्यंत ५४.८५ % मतदान

**नागपूर :** लोकशाहीचाी सर्वात मोठा उत्सव समजल्या जाणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांना आजपासून सुरूवात झाली. पूर्व विदर्भातील रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर, चंद्रपूर या ५ मतदार संघात पहिल्या टप्प्यांतर्गत मतदान पार पडले आहे. यासाठी सकाळपासूनच मतदान केंद्रांवर मतदारांच्या लांबलचक रांगा लागल्या होत्या. मतदान केंद्रावर कुठलाही अनूचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवलेला होता. नक्षलग्रस्त भागात पोलिस आणि सुरक्षा यंत्रणांची अतिरिक्त कुमक मागवण्यात आलेली होती.

या टप्प्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व राज्याचे मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह अनेक नेत्यांचे राजकीय भवितव्य ईव्हीएम बंद झाले आहे.

## छत्रपती संभाजीनगरच्या उमेदवारीची माळ अखेर संदिपान भुमरे यांच्या गळ्यात

### पाहायला मिळणार दोन शिवसैनिकांमधील काट्याची लढत

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

महायुतीमध्ये दीर्घकाळ ताणाताणी घडवून आणणाऱ्या छत्रपती संभाजी नगर लोकसभा मतदारसंघ शिवसेना शिंदे गटाच्या पदरात पडला असून या ठिकाणी संदिपान भुमरे यांना महायुतीची उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे या मतदारसंघात दोन शिवसैनिकांमध्ये काट्याची लढत पाहायला मिळणार आहे.



छत्रपती संभाजीनगर हा मतदारसंघ दीर्घकाळ शिवसेनाकडे आहे. मात्र, शिवसेनेचे दोन गटात विभाजन झाल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने या मतदारसंघावर दावा सांगितला. त्यामुळे महायुतीत प्रचंड दावे प्रति दावे होऊन मतदानाच्या पहिल्या टप्प्यातील तारीख येईपर्यंत या मतदारसंघात महायुतीचा उमेदवार निश्चित होत नव्हता. मात्र एकीकडे पहिल्या टप्प्यातील मतदान होत असतानाच भुमरे यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

या मतदारसंघातून शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे चंद्रकांत खैरे हे महाविकास आघाडीचे उमेदवार आहेत. त्यामुळे भुमरे आणि खैरे हे दोघे शिवसैनिक या निवडणुकीत एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. भुमरे यांनी उमेदवारीची घोषणा होण्यापूर्वीच निवडणुकीची तयारी सुरू केली असून ते २५ तारखेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

# ‘तरुणां’च्या भारताचे प्रश्न

‘तरुणां’च्या भारताचे प्रश्नसंयुक्त राष्ट्रे लोकसंख्या निधी म्हणजेच ‘यूएनएफपीए’च्या ताज्या अहवालात,भारताचीलोकसंख्या आणि संबंधित विविध पैलूंचे जे चित्र रेखाटण्यात आले आहे, ते जेवढे आशादायक, तेवढेच भीतीदायकही आहे. ‘परस्परावलंबी जीवन, आशेचे धागे : लैंगिक आणि पुनरुत्पादक आरोग्य व हक्कांमधील असमानता संपुष्टात आणताना’ असे लांबलचक आणि काहीसे क्लिष्ट शीर्षक असलेल्या या अहवालातूनभारताच्यालोकसंख्येची वाढ आणि तिच्या भविष्यातील वाटचालीवर टाकण्यात आलेला प्रकाश सुखावतो आणि भयभीतही करतो.-ऊतएठढखडएचएछढतब्बल १४४ कोटी लोकसंख्येसह भारताने सर्वाधिक लोकसंख्येच्या देशाचे स्थान पटकावले असल्याच्या तथ्यावर या अहवालाने शिक्कामोर्तब केले आहेच; पण अहवालातील त्यापेक्षाही महत्त्वपूर्ण तथ्य म्हणजे भारतातील तब्बल २४ टक्के लोकसंख्या शून्य ते चौदा या वयोगटातील आहे. योग्यरीत्या वापर केल्यास ही पिढी भविष्यातील समृद्ध भारताची पायाभरणी करू शकते; पण संधी दवडल्यास मात्र भविष्यात भारतासमोर समस्यांचा डोंगर उभा ठाकू शकतो. जेव्हा स्वावलंबी म्हणजेच काम करू शकणाऱ्या वयोगटातील लोकसंख्या, परावलंबी लोकसंख्येपेक्षा, म्हणजेच बालके आणि वृद्धांपेक्षा, लक्षणीयरीत्या जास्त असते, तेव्हा त्या स्थितीला ‘लोकसंख्याशास्त्रीय लाभांश’ असे संबोधले जाते.जेव्हा एखादा देश लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाच्या स्थितीत असतो, तेव्हा त्या देशासाठी ती आर्थिक आघाडीवर घोडदौड करण्याची सुसंधी असते. भारत सध्याच्या घडीला त्या स्थितीत आहे. स्वावलंबी वयोगटातील लोकसंख्येतून कुशल मनुष्यबळाची फौज उभी करण्यात यशस्वी झालेल्या देशाचे भाग्य उजळायला वेळ लागत नाही. मोठ्या प्रमाणातील कुशल आणि तरुण मनुष्यबळ, नाविन्याचा शोध घेतानाच, देशाच्या करसंकलनात भर घालत, देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देऊ शकते. काही दशकांपूर्वी जपानने नेमके तेच करून द्वितीय महायुद्धात राखरांगोळी झाल्यानंतरही फिनिक्स पक्ष्याप्रमाणे भरारी घेतली होती आणि अमेरिकेपाठोपाठ दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याचा मान पटकावला होता. भारतालाही जपानचा कित्ता गिरवायचा असल्यास, युवा पिढीत गुंतवणूक वाढवावी लागेल.तरुणांची ज्ञानाची तहान भागवतानाच, त्यांच्यात विविध स्वरूपाची कौशल्ये विकसित करावी लागतील. त्यासाठी केवळ पुस्तकी शिक्षणावर भर न देता, उद्योग क्षेत्राला ज्या तांत्रिक कौशल्यांची सद्य:स्थितीत आणि भविष्यात गरज असेल, त्यांचे प्रशिक्षण युवा पिढीला द्यावे लागेल. केवळ युवा व कुशल मनुष्यबळ असून भागत नाही, तर ते शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सुदृढ असणेही आवश्यक असते. त्यासाठी देशात जागतिक दर्जाच्या किफायतशीर आरोग्य सुविधा निर्माण करण्यावर भर द्यावा लागेल.

एकटे सरकार वाढत्या लोकसंख्येला रोजगार पुरवू शकत नसल्याची वस्तुस्थिती ध्यानात घेऊन उद्योजकतेला चालना द्यावी लागेल. त्यासाठी मोठ्या संख्येने स्टार्टअप सुरू होतील, अशा वातावरणाची निर्मिती करावी लागेल आणि स्टार्टअप सुरू करू इच्छिणाऱ्या युवांना हरतऱ्हेची मदत करावी लागेल. सध्याच्या घडीला स्टार्टअपच्या संख्येत भारत जगात तिसऱ्या स्थानी असला, तरी पहिल्या स्थानावरील अमेरिका तर सोडाच, पण दुसऱ्या स्थानावरील चीनपेक्षाही खूप मागे आहे. लोकसंख्येत निम्मा वाटा महिलांचा असल्याची वस्तुस्थिती ध्यानात घेऊन, महिलांच्या सक्षमीकरणावर आणखी लक्ष केंद्रित करावे लागेल, जेणेकरून महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून देशाच्या प्रगतीला हातभार लावू शकतील. ही सगळी कामे करण्यासाठी भारताकडे फार थोडा वेळ आहे;कारण आणखी काही वर्षे उलटली की, भारतात वृद्धांची संख्या झपाट्याने वाढू लागेल आणि २०५० च्या सुमारास स्वावलंबी लोकसंख्येच्या तुलनेत परावलंबी लोकसंख्या जास्त होईल. सध्याच्या घडीला जपान त्या अवस्थेतून जात आहे, तर चीनची त्या दिशेने वाटचाल सुरू आहे. थोडक्यात, भारताची अवस्था ‘रात्र थोडी, सोंगे फार’ अशी आहे. हातात वेळ फार कमी आहे आणि तेवढ्या वेळात अनेक गोष्टी मार्गी लावायच्या आहेत. मुठीतील वाळूप्रमाणे वेळ निसटून गेल्यास, भारत जगाशी स्पर्धा करू शकणार नाही आणि आर्थिक आघाडीवर पिछाडेल. वृद्धांची मोठी संख्या सामाजिक सुरक्षा प्रणालींवर दबाव निर्माण करेल आणि त्यातून संसाधनांची कमतरता, सामाजिक असंतोषासारख्या समस्यांना जन्म मिळेल. योग्य संधींच्या अभावी कुशल युवावर्ग विदेशामध्ये संधींचा शोध घेईल आणि त्यामुळे भारताची वाट अधिकच बिकट होत जाईल. थोडक्यात काय, तर भारत अशा चौफुलीवर उभा आहे, जेथून योग्य रस्ता न निवडल्यास, भीषण अपघाताची भीती आहे!

# कोल्हापूर जिल्ह्यात अखेर वळवाची हजेरी

## उष्म्याने हैराण झालेल्या नागरिकांना काहिसा दिलासा

**कोल्हापूर :** गेल्या काही दिवसांपासून उष्म्याने हैराण झालेल्या शहरवासीयांना रात्री झालेल्या वळीव पावसाने थोडासा दिलासा दिला. हा दिलासा फार काळ टिकला नाही. केवळ वीस मिनिटे बरसलेल्या या पावसाने रात्रीची झोप मात्र नकोशी करून सोडली.पाऊसपडून गेल्यानंतर रात्री पुन्हा उकाड्याने शहरवासीय हैराण झाले.

नवीन वर्षातील पहिल्या वळीव पावसाची शहरवासीय गेल्या काही दिवसांपासून आतुरतेने वाट पाहत होते. दिवसभर कडाक्याचे ऊन, त्यामुळे होणाऱ्या अंगाची काहिलीने नागरिक भलतेच अस्वस्थ होते. दुपारच्या वेळी उन्हातून फिरणेदेखील मुश्कील होऊन गेले होते.

गुरुवारी दिवसभर फारच गदगदत होते. अंगातून घामाच्या धारा लागलेल्या होत्या. सायंकाळी वळीवपाऊसपडेल असे वातावरण तयार झाले होते. रात्री थोडे वारे सुटले. त्यानंतर साडेदहा वाजण्याच्या सुमारास आकाश भरून आले. जोरदार वारे, विजांचा लखलखाट होऊ लागल्याने जोराचा पाऊस पडेल अशी अपेक्षा होती. केवळ वीस मिनिटेच पाऊस झाला. या वर्षातील पहिलाच पाऊस असल्याने मातीचा सुगंध सुटला. पण, वीस मिनिटांनंतर मात्र पाऊस थांबला. शहरवासीयांची जोरदार पावसाची अपेक्षा भंग पावली.

**कसबा वाळवे परिसरात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस**

**कसबा वाळवे :** विजांचा कडकडाट व वादळी वाऱ्यासह आज रात्री १०:३० वाजेच्या सुमारास येथील परिसरात जोरदार पाऊस झाला. त्यामुळे लोकांची तारांबळ उडाली. रात्री उशिरापर्यंत पावसाची संततधार सुरू होती. हवेत गारवा पसरल्याने उकाड्याने त्रस्त असलेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला.

**राधानगरीत वादळी वाऱ्यासह मुसळदार पाऊस**

**राधानगरी :** राधानगरीत गुरुवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास विजांच्या कडकडाटात वादळी वाऱ्यासह मुसळधार अवकाळी पावसाने हजेरी लावली. वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडे पडली. राधानगरीसह धरण परिसरात तासभर पडलेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला. ऊस पिकांना पाणी मिळाल्याने शेतकरी सुखावला. मुसळधार पावसामुळे राधानगरीसह परिसरातील वीजपुरवठा रात्री खंडित करण्यात आला होता.

**शिरोळ तालुक्यात अवकाळी पावसामुळे नुकसान**

**गणेशवाडी :** शिरोळ तालुक्यात बुधवारी दुपारी चार वाजता वादळी वाऱ्यासह वळीव पावसाने दमदार हजेरी लावली. अवकाळी पावसामुळे भाजीपाला, केळी, उसाचे मोठे नुकसान झाले आहे. शासनाने पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे. या पावसामुळे राजापूर, खिद्रापूर परिसरात भाजीपाला, उसाचे नुकसान झाले आहे. वांगी, टॉमटो या भाजीपाल्याची रोपे वादळी वाऱ्यामुळे उपटून पडली आहेत. केळीचे झाडेही तुटल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. ऊस पिकाचेही मोठे नुकसान झाले आहे.

# येत्या मंगळवारी जोतिबाची चैत्र यात्रा; प्रशासनाची जय्यत तयारी

**जोतिबा :** दख्खनचा राजा जोतिबाची चैत्र यात्रा मंगळवारी (दि. २३) होत असून, सर्व शासकीय यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. प्रशासकीय अधिकारी जोतिबा डोंगरावर येऊन प्रत्यक्ष नियोजनाची पाहणी करीत आहेत. संबंधित विभागांच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना कामातील त्रुटींवर सुधारणा करण्यासाठी सूचना दिल्या जात आहेत.

जोतिबा चैत्र यात्रेसाठी गेले दोन महिने नियोजन बैठक घेण्यात आल्या असून बैठकीत केलेल्या सूचनांची प्रत्यक्ष पाहणी प्रशासकीय अधिकारी करीत आहेत. गटविकास अधिकारी पंचायत समिती पन्हाळा यांनी वसुंधरा शौचालये, रंगकाम व स्वच्छता, भक्तांची निवास व्यवस्थेची पाहणी करण्यात आली. अन्न व औषध प्रशासन यांच्यामार्फत प्रसाद विक्री करणाऱ्या दुकानदारांना निर्भेळ प्रसाद विक्री करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. दुग्धजन्य पदार्थ विकणाऱ्यांना प्रत्येक पॅकवर उत्पादन तिथी लिहूनच विक्री करण्याचे आदेश दिलेले आहेत. उघड्यावर ठेवलेले पेढे विक्रीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. उपविभागीय अधिकारी, देवस्थान सचिव, तहसीलदार, गटविकास अधिकारी यांच्यामार्फत चैत्र यात्रा नियोजन आढावा घेण्यात आला. यावेळी पायरी मार्गांवरील दुकानदारांना पेढा, मिठाई, गुलाल, प्लास्टिक बंदी, अतिक्रमणाबाबत सक्त श्री यमाई मंदिर परिसरातील पार्किंग, स्वच्छता, पाणी या बाबींची पाहणी करण्यात आली.

# महायुतीचे उमेदवार धैर्यशील माने यांना संसदेत पाठवा: चंद्रकांत दादा पाटील

**शिरोळ :** काँग्रेस राजवटीमध्ये मराठा समाजाचे अर्धा डझनहून अधिक मुख्यमंत्री झाले मात्र त्यांना मराठा समाजाचा आरक्षणाचा प्रश्न सोडवता आला नाही भाजपाचे नेते माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केला केला आहे तर महा इती चे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील मराठा समाजाला आरक्षण मिळणे साठी निखराचा लढा चालू ठेवला आहे या व अशा अनेक प्रश्नांना बळ देण्यासाठी आणि तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी महायुतीचे उमेदवार धैर्यशील माने यांना संसदेत पाठवा असे आवाहन जिल्ह्याची माजी पालकमंत्री नामदार चंद्रकांत दादा पाटील यांनी येथे बोलताना केले




शिरोळ येथील महायुतीच्या मेळाव्यात हात उंचावून अभिवादन करताना भाजपचे मंत्री चंद्रकांत दादा पाटील व इतर मान्यवर

शिरोळ येथील समर्थ मंगल कार्यालयात शिरोळ विधानसभा मतदारसंघातील भाजपा कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित केला होता

त्याप्रसंगी ते बोलत होते यावेळी खासदार धनंजय महाडिक माजी आमदार सुरेश हळवणकर भाजपाचे नेते हिंदुराव शेळके श्री गुरुदत्त शुगर साखर कारखान्याचे चेअरमन माधवराव घाडगे आदी प्रमुख मंडळी उपस्थित होती

नामदार चंद्रकांत दादा पाटील पुढे म्हणाले काँग्रेस अफवा पसरविण्यात माहेर आहे संविधान कोणीही बदलू शकणार नाही दुरुस्त्या होऊ शकतात काँग्रेसच्या काळात १०६ वेळा घटनादुरुस्ती करण्यात आली आहे त्यावेळी काँग्रेस नेते कुठे होते असा सवाल करून ते म्हणाले दुरुस्ती आणि बदल हे समजून घेण्याची बाब आहे गैरसमज पसरवणे सोपे असते हे समजून घेतले पाहिजे असे सांगून ते पुढे म्हणाले मुस्लिम बांधवांचे अधिकार व हक्क यासाठी भाजपा कटिबद्ध आहे मुस्लिम बांधवांच्या मनामध्ये विरोधक द्वेष पसरवण्याचा कार्यक्रम हाती घेतलेले आहेत त्यापासून मुस्लिम बांधव दूर राहतील अशी मला खात्री आहे असे सांगून त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तळागाळापर्यंत राबवलेल्या विविध योजनांची सविस्तर माहिती सांगितली अधिका अधिक जनतेपर्यंत भाजपा पोचवण्यासाठी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासारखे गतिमान सरकार आणण्यासाठी देशामध्ये भाजपाला पर्याय नाही तेव्हा विरोधकांच्या कोणत्याही भुलथापाला बळी न पडता नरेंद्र मोदी ना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी आणि भाजपला चारशे पार जागा उपलब्ध करून देण्यासाठी भाजपा कार्यकर्त्यांनी जिवाचे रान करावे असेही त्यांनी यावेळी सांगितले खासदार धनंजय महाडिक यांनी काँग्रेस पक्षाने केलेल्या भ्रष्टाचारावर त्यांनी एक नजर टाकली विकासाचे कोणतेच विजन नसलेला काँग्रेस पक्ष हा भरकटत चालला आहे खोटी आश्वासन देऊन जनतेची दिशाभूल करण्याचा केविलवाना प्रयत्न सुरू आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी आश्वासन देत नाहीत तरी प्रत्यक्षात कृती करून सामान्य जनतेला दिलासा देण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे अशा या भाजप सरकारला पुन्हा संधी देण्यासाठी महायुतीचे उमेदवार धैर्यशील माने यांना प्रचंड मताने विजयी करून मोदी सरकारचे हात बळकट करा असे सांगून त्यांनी देशामध्ये आणि राज्यांमध्ये भाजपाने केलेल्या विकासाभिमुख कार्याचा आलेख मांडला

माहितीचे उमेदवार खासदार धैर्यशील माने म्हणाले या तालुक्यातील जनता स्वाभिमानी आहे हित आणि अनहित येथील मतदारांना कळते शिरोळ तालुका हा जागृत तालुका आहे या तालुक्याला देश म्हणून रत्नाप्पाण्णा कुंभार यांचा वारसा लाभलेला आहे घटनेवर सही आहे ही गोष्ट साधी नाही असे सांगून ते म्हणाले माझ्या मतदारसंघात मी भरपूर विकास कामे केलेली आहेत धैर्यशील माने आणि या मतदारसंघात काय केले असा डांगोरा पिटणारे विरोधक एकाकी पडली आहेत त्यांची दयनीय अवस्था झालेली आहे महायुती सरकारने केलेल्या विकास कामाची त्यांनी माहिती घेऊन नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी आणि या मतदारसंघाचा चेहरा मोहरा अधिक अधिक बदलण्यासाठी मला विजयी करावे असे सांगितले

गुरुदत्त शुगर साखर कारखान्याचे चेअरमन माधवराव घाडगे म्हणाले साखर उद्योग धंद्याबाबत नरेंद्र मोदी सरकार यांचे धोरण साखर उद्योग ला दिलासा देणारे व अनुकूल आहे त्यामुळे कारखानदाराला नवसंजीवनी मिळाली आहे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत देशाला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे त्यांच्या कामाचा आदर्श इतर देश घेत आहेत हे अभिमानाने सांगावेसे वाटते नामदार चंद्रकांत दादा पाटील यांच्या माध्यमातून ७५ कोटी रुपयाचा विविध विकासकामे मला माझ्या परिसरात करता आली हे मी माझे भाग्य समजतो विकास कामाचं दुसरं नाव म्हणजे भाजप आहे या मतदारसंघाचा विशेषता शिरोळ तालुक्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी भाजपा शिवाय पर्याय नाही तेव्हा महायुतीचे उमेदवार खासदार धैर्यशील माने यांना मते देऊन विजयी करावे अशी त्यांनी सांगितले भाजपाचे युवा नेते राजवर्धन नाईक निंबाळकर विजय भोजे सुरेश सासणे आदींनी मनोगत व्यक्त केली प्रारंभी स्वागत भाजपाचे तालुकाध्यक्ष मुकुंद गावडे यांनी केले

यावेळी माजी आमदार सुरेश हळवणकर हिंदुराव शेळके दलित मित्र अशोकराव माने गुरुदत्त साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक राहुल घाटगे भाजप जिल्हा पूर्व अध्यक्ष डॉक्टर अरविंद माने माजी नगरसेवक उदय डांगे माजी नगराध्यक्ष डॉ.

नीता माने माजी पंचायत समिती सभापती भालचंद्र कागले माजी उपसभापती हरिचंद्र पाटील भाजपाचे नेते पोपट पुजारी जयपाल मानगावे सिताराम भोसले अन्वर जमादार मिश्रलाल जाजू सतीश मलमे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते

# पाणी देणार नसाल, तर कर्नाटकात जाण्याची परवानगी द्या



## कवठेमहांकाळचे शेतकरी आक्रमक

**कवठेमहांकाळ :** पाणीदेणार नसाल, तरकर्नाटकातजाण्याची परवानगी द्या अशी मागणी कवठेमहांकाळ तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली आहे. म्हैसाळ व टेंभू सिंचन योजनेचेपाणीअग्रणी नदीत सोडावे यासाठी ते आक्रमक झाले आहेत.

सिंचन योजनांचे कालवे सध्या तुडुंब भरून वाहत आहेत. तालुक्याची जीवन वाहिनी असलेली अग्रणी नदी मात्र कोरडीठाक पडली आहे. घाटमाथ्यावर टेंभू सिंचन योजना वाहत असून गावे कोरडी पडली आहेत. योजना असूनही गावांना फायदा नाही, त्यामुळे अग्रणीकाठचे तहानलेलेशेतकरीअग्रणी नदीत आंदोलन करताना दिसत आहेत.

अग्रणी नदी खोऱ्यात मळणगाव, शिरढोण, मोरगाव, विठुरायाचीवाडी, हिंगणगाव, अग्रण धुळगाव, लोणारवाडी अशी गावे आहेत. अग्रणी नदी बारमाही झाल्यास गावे दुष्काळमुक्त होतील. त्याचबरोबर हजारो हेक्टर शेती ओलिताखाली येईल. फळशेती, फुलशेतीबरोबर भाजीपाल्याचा शेती व्यवसाय हायटेक बनवत आर्थिक स्थैर्य प्राप्त होईल. पण पाणी सोडण्याकडे अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप तेथील शेतकरी करताना दिसत आहेत.

पाटबंधार विभागाला अग्रणी नदीमध्ये पाणी सोडण्याची मागणी केली; परंतु ते दुर्लक्ष करत आहेत. काही दिवसांत पाणी अग्रणीला नाही सोडले, तर आंदोलन करणार आहोत.

म्हैसाळ योजनेच्या पाण्याने धुळगावमधील बंधारे भरून मिळावेत यासाठी तहसीलदारांना निवेदन दिले. पण दखल न घेतल्यामुळे आम्ही सर्व सदस्य व ग्रामस्थांना अग्रणी नदीमध्ये उपोषण करावे लागले. पुन्हा आंदोलनाची वेळ येऊ नये. -शिवदास भोसले, सरपंच, अग्रण धूळगावलोणारवाडी गावाने दुष्काळाच्या झळा खूप सोसल्या आहेत. शासनाने अग्रणी नदीला पाणी सोडावे, अन्यथा आम्हाला कर्नाटक राज्यात सामील होण्यासाठी परवानगी द्यावी.

# रविवारी शिरोळातील मास मटन मासे विक्री दुकाने बंद ठेवण्याचे पालिकेचे आवाहन

**शिरोळ :** कोल्हापूर जिल्ह्यात रविवार दिनांक २१, एप्रिल,२०२४ रोजी जैन बांधवांचा भगवान श्री महावीर जयंती स्वामी जन्मकल्याण महोत्सव (महावीर जयंती उत्सव संपन्न होणार आहे. सदर दिवस ’अहिंसा दिन’ म्हणुन सर्वत्र पाळला जाणार असून त्या दिवशी सार्वजनिक ठिकाणी व कत्तल खान्यात पशु-पक्षांची कत्तल होवून जैन धर्मिय लोकांच्या भावना दुखावून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी श्री. महावीर जयंतीच्या अनुषंगाने रविवार दिनांक २१.०४.२०२४ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व कत्तलखाने व मांस विक्री दुकाने बंद करणेची कार्यवाही करण्यास कळविण्यात आले आहे. त्यानुसार शिरोळ नगरपरिषद क्षेत्रातील सर्व मच्छी मास विक्री दुकाने बंद करण्याचे आवाहन पालिकेचे प्रशासकता मुख्याधिकारी निशिकांत प्रचंडराव यांनी केले आहे

कोल्हापूर जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार शिरोळ नगरपरिषद क्षेत्रातील सर्व कत्तलखाने व मांसविक्री दुकाने रविवार दिनांक २१. एप्रिल२०२४ रोजी बंद ठेवणेबाबत नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने आवाहन करण्यात येत असल्याचे प्रसिद्धपत्रक पालिकेच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आले आहे

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# कण्हेरीच्या मारुती मंदिरात दुमदुमला 'तुतारी'चा जयकार!

## शरद पवारांच्या हस्ते नारळ फोडून सुप्रिया सुळेंच्या प्रचाराचा शुभारंभ






**राजदंड / बारामती**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते कण्हेरी येथील मारुती मंदिरात नारळ वाढवून खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी कण्हेरी येथील ग्रामस्थ, पवार कुटुंबीय आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

यानंतर उपस्थितांशी संवाद साधताना शरद पवार म्हणाले, की भाजपाला घटना बदलायची आहे म्हणून त्यांना जास्तीत जास्त खासदार निवडून आणायचे आहेत, असे त्यांच्यातीलच एक मंत्री म्हणाले. आमच्या दहा वर्षाच्या कार्यकाळाचा हिशेब मागणाऱ्यांनी अगोदर त्यांच्या २०१४ ते २०२४ या काळातील राजवटीचा हिशेब द्यावा. या काळात कुणाचे राज्य होते असा सवालही त्यांनी विचारला.

सकाळी पवारांसोबत हनुमान मंदिरात दर्शन घेतल्यानंतर सुप्रिया सुळे यांनी देखील उपस्थितांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या की, आपल्याला वाद वाढवायचा नाही, संघर्ष वाढवायचा नाही, काम करायचे आहे आणि तुतारी वाजवायची आहे. साहेबांनी ९० टक्के वेगवेगळ्या संस्था बारामती तालुक्यासह महाराष्ट्रामध्ये आणल्या आहेत. आमदार रोहित पवार म्हणाले की, कोणी कितीही काहीही म्हटले, तरी संपूर्ण महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला माहित आहे, की बारामती आणि महाराष्ट्राचा विकास कोणी केला, यंदा सुप्रिया सुळे यांना बारामती तालुक्यात कमीत कमी दीड लाखाचा लीड मिळेल असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. आमदार संजय जगताप यांनी यावेळी बोलताना बारामती पेक्षा पुरंदर तालुका ताईला जास्त लीड देईल असा विश्वास व्यक्त केला.

### ९६ वर्षांचे गुरूजी आणि साहेबांची ओळख

**पवार साहेब भाषणाला उभे राहताच उपस्थित नागरिकांमधून एकच जयघोष झाला. 'देश का नेता कैसा हो, शरद पवार जैसा हो' म्हणत दिलेल्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. श्रोत्यांमध्ये काही ज्येष्ठ नागरिक समोर बसले होते. त्यांपैकी एक गुरुजी असून ते सध्या ९६ वर्षांचे आहेत, त्यांना सर्वांना शरद पवार यांनी ओळखले. त्यांनी ओळख देताच उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांना दाद दिली.**

दरम्यान, सन १९६७ पासून प्रत्येक निवडणूकीत शरद पवार याच मंदिरातून नारळ फोडून प्रचाराची सुरुवात करतात.याशिवाय वेळ मिळेल तसे आणि बारामतीत असल्यानंतर ते अनेकदा सहकुटुंब दर्शनाला देखील येतात. त्यानुसार आजही खासदार सुळे यांच्या प्रचाराचा नारळ येथेच फोडण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष जगन्नाथ शेवाळे, सतीश मामा खोमणे, आमदार संजय जगताप, श्रीनिवास पवार, आमदार रोहित पवार, सत्यवान काळे, जितेंद्र पवार, कविता मित्र, राजेंद्र दादा पवार, बारामती तालुका अध्यक्ष एस एन बापू, यांच्यासह पवार कुटुंबीय, अन्य पदाधिकारी तसेच कार्यकर्ते आणि मोठ्या परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पवारांनी शेताच्या बांधातच रहावं, शेजारचा देवाचा बांध रेटू नये!

## भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष माधव भंडारी यांचा टोला



**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** अयोध्या येथील मंदिरात बाल रामचंद्राची मूर्ती आहे. याची माहिती न घेताच प्रभू श्री रामचंद्राच्या मंदिरात सीतामाईंची मूर्ती का नाही याची चौकशी नास्तिक म्हणवणार्या पवार साहेबांनी करू नये. त्यांनी आपल्या शेताच्या बांधातच बोलावे, देव, धर्म, देऊळ या त्यांच्या प्रांतात नसलेल्या बांधात घुसखोरी करू नये, असा टोला भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी यांनी शुक्रवारी लगावला.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी अयोध्येतील मंदिरात सीतेची मूर्ती का नाही, असा सवाल अलिकडेच उपस्थित केला आहे. त्यासंर्दभात भांडारी बोलत होते.

भांडारी म्हणाले की, पवार साहेबांसारख्या ज्येष्ठ नेत्याने असे विधान करण्यापूर्वी प्राथमिक माहिती घेतली असती तरी बरे झाले असते. कुटुंबातील सुनेला बाहेरची म्हणून आपला स्त्री शक्तीबद्दलचा खरा दृष्टिकोन दाखवणार्या साहेबांनी ऊसाचा उतारा, द्राक्षाची छाटणी, डाळींब लागवड यासारख्या त्यांच्या अभ्यासाच्या विषयांवर हवे तितके बोलावे. मात्र देव-धर्म, संस्कृती विषय त्यांच्या ''सात बाऱ्या' वर कधीच दिसला नाही. अभ्यास नसलेल्या अशा विषयांबद्दल बोलून पवार साहेबांसारख्या ज्येष्ठ नेत्याने आपल्या 'मती'चे दिव्यदर्शन घडवू नये.

आदरणीय पवार साहेबांच्या कृषी क्षेत्रातील ज्ञानाबद्दल सर्वांनाच आदर आहे. त्यांनी आपल्या संबंधित क्षेत्राबाबत मत प्रदर्शन केले तर कोणाचाच आक्षेप असण्याचे कारण नाही. मात्र ते स्वत:ला नास्तिक म्हणवतात. त्यामुळे प्रभू रामचंद्राच्या मंदिरात सीतामाईची मूर्ती का नाही, याची काळजी त्यांनी करू नये, असेही ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, पवार साहेबांना बोलण्यासाठी विषय हवा असला तर बारामती तालुक्यातील जिरायती भागाला का पाणी मिळू शकले नाही, यासारखा चांगला विषय नाही. सध्या ते बारामतीतच अडकून पडल्याने त्यांना आपल्या तालुक्यातील जिरायती भागाला का पाणी मिळू शकले नाही, याबाबतचा शोध निबंध तयार करता येईल.

# पंतप्रधान मोदींची पुण्यात २९ एप्रिलला सभा



**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** पुण्यातील महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा होणार आहे. स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर ही सभा होणार आहे.

पुणे लोकसभा मतदार संघातून भाजपने मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी दिली. त्यानंतर मोहोळ यांनी निवडणूक प्रचारास सुरुवात केली. ग्रामदेवतांच्या दर्शनाने त्यांनी प्रचाराचा नारळ फोडला.

आता खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारार्थ पुण्यात येणार आहे. भाजपने लोकसभेसाठीच्या उमेदवारांच्या दुसऱ्या यादीत पुणे लोकसभा मतदार संघातून मुरलीधर मोहोळ यांना खासदारकीसाठी तिकीट दिलं आहे. तर, त्यांच्याविरुद्ध महाविकास आघाडीने रवींद्र धंगेकर यांना उमेदवारी दिली आहे. दोघेही जोरदार प्रचार करत असून मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी पुण्यात येऊन जाहीर सभा घेणार आहे. पुण्यात २९ एप्रिलला स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर ही सभा होणार आहे.

उमेदवारी मिळाल्या नंतर मोहोळ आणि धंगेकर यांनी प्रचाराचा धडाका लावला आहे. तर, दुसरीकडे वंचितचे उमेदवार वसंत मोरे यांनीही प्रचाराला सुरुवात केली आहे. त्यामुळे पुण्यात तिरंगी लढत होण्याची चर्चा आहे.

### मराठी भाषिक मंडळ टोरंटो कॅनडातर्फे आयोजित ३६ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या

# अध्यक्षपदी डॉ. संजय उपाध्ये यांची बिनविरोध निवड



**राजदंड / पुणे**

कॅनडातील टोरंटो येथील मराठी भाषिक मंडळ या सेवाभावी संस्थेतर्फे २१ एप्रिल रोजी २०२४ रोजी ३६ व्या मराठी साहित्य सम्मेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाच्या मानद अध्यक्ष (बाह्य) पदासाठी प्रसिद्ध गप्पाष्टककार व मन करारे प्रसन्नाचे सादरकर्ते डॉ. संजय उपाध्ये यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. अशी माहिती कॅनडा निवासी आणि सध्या पुणे दौर्यावर असलेले मंडळाचे ज्येष्ठ सदस्य चंद्रशेखर मराठे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मराठी भाषिक मंडळाचे अध्यक्ष ऋषिकेश रानडे, कार्यवाहक संग्रम पाटील आणि कोषाध्यक्ष नंदन जोशी यांनी मंडळाच्या वतीने अधिकृत पत्राद्वारे वरील माहिती मंडळाचे प्रवक्ते चंद्रशेखर मराठे यांना पाठविली आहे. परदेशात असुनही गेली ५० वर्षे हे मंडळ कार्यान्वित असून उत्तर अमेरिकेतील हे पहिले मराठी मंडळ आहे. या शिवाय मराठी शाळा गेल्या ५० वर्षापासून चालविली जाते. या संमेलनामध्ये काव्यवाचन, नाटयवाचन, कथा कथन आणि साहित्यीक विषयांवरील भाषणे असे बहुरंगी कार्यक्रम आहेत. संमेलनाचा शेवटी अध्यक्ष डॉ. संजय उपाध्ये यांच्या सोबत 'मराठी भाषेतीची स्थिती-देशात-विदेशात' या विषयावर साहित्यीक गप्पा आणि प्रश्नोत्तरे होणार आहेत, असे मंडळाचे अध्यक्ष ऋषिकेश रानडे आणि सचिव संग्राम पाटील यांनी कळविले आहे.

आयोजित संमेलनात डॉ. संजय उपाध्ये हे 'जिंकलो असे म्हणा' या विषयावर अध्यक्षीय भाषण करतील. मराठी भाषिक मंडळाचे अध्यक्ष रानडे व कार्यवाहक संग्रम पाटील यांनी सांगितले की डॉ. संजय उपाध्येंसारखे रंगभूमी वरील नाट्य लेखक, अभिनेता, गप्पाष्टककार, मन करारे प्रसन्न सारख्या लोकप्रिय एकपात्री कार्यक्रमांच्या माध्यमातून समाज प्रबोधन करतात. त्याच प्रमाणे लेखसंग्रह, संपूर्ण गीतेवर आधारित गीत भगवद्गीता, वास्तव काव्यसंग्रह, इंडेमाऊची गाणी हा बालगीत संग्रह आणि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे चरित्र ओवीबद्ध रचणारे कवि डॉ. संजय उपाध्ये या मानद अध्यक्ष (बाह्य) पदाची गरिमा आणखी वाढवतील अशी आशी खात्री आम्हाला आहे.

डॉ. उपाध्ये यांची निवड झाल्यानंतर सर्व स्तरावरून अभिनंदन व शुभेच्छा दिल्या जात आहे.

पान १ वरून

## मराठी माणसांचे पक्ष भाजपने फोडले - जयंत पाटील

ऐकत नाहीत, हा माझा अनुभव आहे. आपल्याला भाजपला पराभूत करायचे आहे, त्यामुळे आपले मतभेद बाजूला ठेवून एकास एक लढत झाल्यास, आजच निकाल लागेल. असे स्पष्टीकरण आज पुन्हा जयंत पाटील यांनी दिले.

■ **भाजपच्या खासदाराला जनता तडीपार करेल**

खासदार संजय राऊत म्हणाले, '' सांगली ही क्रांतिकारकांची भूमी आहे. जेव्हा जेव्हा देश संकटात आला, तेव्हा तेव्हा देशाच्या स्वातंत्र्यासाठी सांगलीने आपले योगदान दिले आहे. देशाचे स्वातंत्र्य आज धोक्यात आले आहे, त्यामुळे आता सांगलीला मागे राहता येणार नाही, मोदी म्हणजे ईस्ट इंडिया कंपनी आहे, त्यांना आपल्याला घालवायचे आहे, आणि त्या क्रांतीची सुरुवात सांगलीतुन होणार आहे. सांगलीच्या भाजपच्या खासदाराला तडीपार करून त्याची सुरुवात सांगलीतून करायची आहे. ईडीच्या बापाला पण आम्ही घाबरत नाही, आता ती भीती आम्हाला नका घालू, लढाई एकास एकच होईल, त्यामध्ये आपला पैलवान विजयी होईल. देशाच्या भल्याचा विचार करणारे पक्ष आपल्यासोबत आहेत. शेतकऱ्यांचा पोरगा संसदेत शेतकऱ्यांचे प्रश्न मांडेल, ही मशाल संसदेत कधीही विझणार नाही. असे राऊत म्हणाले.

■ **१६ वर्षांनी जयंत पाटील पुन्हा मारुती चौकात**

सांगली महानगरपालिका निवडणुकी २००८ साली माजी मंत्री मदनभाऊ पाटील यांना रोखण्यासाठी भाजप आणि राष्ट्रवादी यांची महाआघाडी स्थापन करण्यात आली होती, ज्यामध्ये दिवंगत भाजपचे नेते संभाजी पवार, जयंत पाटील, संजयकाका एकत्र होते, त्यावेळी जयंत पाटील यांची मारुती चौकात सभा झालेली होती, त्यानंतर राजकारणात अनेक बदल झाले, आज हे सगळे नेते जयंत पाटील यांच्या विरोधात असताना त्यांनी पुन्हा १६ वर्षांनी मारुती चौकात भाषण केले.

## सराईत गुन्हेगाराने दिली तीन घरफोड्यांची कबुली

दिली.

पोलिसांनी चोरीच्या मालाबाबत विचारणा केली असता त्याने पोलिसांना सिलेंडर टाक्या, एलईडी, फ्रीज, दुचाक्या असा मुद्देमाल दिला. पोलिसांनी त्यानुसार मुद्देमाल जप्त केला. पोनि राजेंद्र मस्के, पोनि निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि अविनाश माने, फौजदार सुधीर मोरे, पोलीस सुजीत भोसले, निलेश जाधव, पंकज मोहिते, विक्रम माने, इरफान मुलाणी, संतोष घाडगे, सागर गायकवाड, विशाल धुमाळ, मच्छिंद्रनाथ माने, सचिन रिटे, सुशांत कदम यांनी कारवाईत सहभाग घेतला.

# काँग्रेसमुळेच पुणे शहराला आले भरभराटीचे स्वरूप : रवींद्र धंगेकर



**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** काँग्रेस पक्षाच्या राजवटीतच पुणे शहराला उद्योगनगरी, क्रीडानगरी,आयटीनगरी, उद्याननगरी, महोत्सवाची नगरी असे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यातून पुणे शहराला भरभराटीचे स्वरूप आले आहे. लाखो तरुण व महिलांना चांगला रोजगार येथे निर्माण झाला. त्यामुळेच पुणे शहराच्या विकासात काँग्रेसचे योगदान अमूल्य आहे याची जाणीव सर्वसामान्य पुणेकर नागरिकांना आहे. म्हणून ते या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या पाठीशी उभे राहतील असा विश्वास पुण्यातील महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी व्यक्त केला. या प्रसंगी पुणे लोकसभा निवडणूक प्रचारप्रमुख व माजी आमदार मोहन जोशी म्हणाले की, या निवडणुकीतील ही पहिलीच पदयात्रा असून नागरिकांचा मोठा उत्स्फूर्त प्रतिसाद उमेदवार रवींद्र धंगेकर यांना मिळत आहे. असेच वातावरण सर्व पुण्यात असून रवींद्र धंगेकर हे चांगल्या मताधिक्याने विजयी होतील याची प्रचीतीच या पदयात्रेला मिळत असलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादावरून दिसून येते.

निवडणूक उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर आज पासून लगेच धंगेकर यांनी पुणे शहरातील मतदारांच्या भेटीगाठीसाठी आपल्या धडाकेबाज पदयात्रांना प्रारंभ केला. आज कसबा विधान मतदार संघात ग्रामदैवत कसबा गणपतीची आरती करून त्यांची जीप यात्रा / पदयात्रा सुरु झाली व स. प. महाविद्यालय चौक येथे समाप्त झाली त्यानंतर ते बोलत होते.

पुण्यातून निवडून गेलेल्या काँग्रेसच्या सर्वच खासदारांनी प्रयत्नांची शिकस्त करून शहराच्या वैभवात भर घातली आहे, याची जाणही पुणेकरांना आहे असे ते म्हणाले. आपणही अशीच दैदिप्यमान कामगिरी करून पुणेकरांचा विश्वास सार्थ ठरवू असा विश्वास त्यांनी शेवटी व्यक्त केला.

प्रारंभी रवींद्र धंगेकर यांनी पुण्याचे ग्राम दैवत श्री. कसबा गणपतीचे दर्शन घेत आरती केली. ढोलताशांचा गजर, रविंद्र धंगेकर यांच्या विजयाच्या घोषणा व फटाक्यांची आतषबाजी, ठिकठिकाणी महिलांकडून धंगेकर यांचे औक्षण, पदयात्रेवर होणारी पुष्पवृष्टी, प्रत्येक घरांतून धंगेकर यांना हात दाखवून भाऊ विजय तुमचाच होणार, असा उत्स्फूर्त प्रतिसाद कसबा विधानसभा मतदार संघातील पदयात्रेत रविंद्र धंगेकर यांना मिळाला.

पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व लोकसभा निवडणूक समन्वयक अरविंद शिंदे, पुणे लोकसभा निवडणूक प्रचारप्रमुख व माजी आमदार मोहन जोशी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहरप्रमुख गजनान थरकुडे, माजी गृहराज्य मंत्री रमेश बागवे, माजी आमदार दीप्ती चवधरी, डॉ. रोहित टिळक, ज्येष्ठ नेते रविंद्र माळवदकर संगिता तिवारी, निता परदेशी, नाना करपे, गौरव बोराडे, स्वाती शिंदे, गोरख पळसकर, गणेश नलावडे, दीपक जगताप, रोहन पायगुडे, दीपक पोकळे, अजिंक्य पालकर, अप्पा जाधव, आम आदमी पक्षाचे सुदर्शन जगदाळे, धनंजय बेनकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळी ८ वाजता पदयात्रेला सुरुवात झाली त्यांच्यासमवेत काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, आम आदमी पार्टी आणि अन्य मित्र पक्षांचे प्रमुख पदाधिकार्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजवाडा परिसरातून सोन्याच्या चेनची चोरी

**सातारा :** राजवाडा परिसरातून सव्वा लाखांच्या सोन्याच्या चैनची अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची फिर्याद शाहूपुरी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, राजवाडा परिसरात अज्ञात चोरट्याने १ लाख २५ हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन चोरुन नेली. ही घटना दि. १५ एप्रिल रोजी गांधी मैदान परिसरात घडली.

### आता सर्वांना शिक्षणाचे दारे उघडे करून देणाऱ्या

# भीमरावांना त्या काळी शिक्षणाची दारे बंद होती : जगदीश ओव्हाळ




**हडपसर : प्रतिनिधी**

आता सर्वांना शिक्षणाची दारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेच्या माध्यमातून खुले करून दिली त्याच बाबासाहेबांना त्याकाळी शिक्षणाची दारे बंद होती जेंव्हा लहान भीवा शाळेत जात असताना भूतकाळ आठवतो की, लहान भीवा शाळेच्या बाहेर बसून शिक्षण घेत होता, त्याला फळ्याला शिवता येत नव्हते ,माठाला हात लावता येत नव्हते ,वर्गाच्या बाहेर उघड्यावर बसून शिकावे लागले,फाटकी पिशवी आणि त्यात फडक्यात बांधून आणलेली वाळलेली भाकरी जेंव्हा दुपारी खायला भीमा घ्यायचे त्यांना घशाला कोरड पडायची माठाचे पाणी घेण्यास मुबा नव्हती,असेच एकदिवस गुरुजी फळ्यावर लिहित मुलांना प्रश्न विचारला मुलांनो सांगा अशी कोणती वस्तू आहे त्याला हात लावता येत नाही , लहान भिवाने लगेच हात वर करुन म्हणाले गुरुजी मला येते जो माठ रोज दिसतो त्यास हात लावता येत नाही , फळा दिसतो त्याला हात लावता येत नाही,शिक्षकाने जे उत्तर ऐकले ते काही भूगोलाची नव्हते ,ना विज्ञानाचे नव्हती,समाजव्यवस्थेला , सामाजिक विषमतेला मारलेली चपकारक होती,हे जेंव्हा गुरुजींना कळले, तेंव्हा त्या लहान भीवाच्या बुध्दीमतेची गुरुजींना जाणीव झाली.

वर्गाच्या बाहेर बसून शिकणारा भीमराव वयाच्या २२ व्या वर्षी अमेरिकेत कोलंबिया विद्यापीठात शिक्षण घेऊन आज समाजव्यवस्था मोडीत काढत सर्वांना समान न्याय हक्क राज्यघटनेच्या माध्यमातून सर्वांना समान अधिकार दिले, सर्वांना शिक्षणाचे दारे उघडे करुन दिले अशा महान महामानवाचे विचार सर्वांनी अंगीकारले पाहिजे, त्यांचे विचार आत्मसात केले पाहिजे तरच ख-या अर्थाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केल्या सारखे होईल असे मत जेष्ठ साहित्यिक लेखक जगदीश ओव्हाळ यांनी हडपसर क्षेत्रीय कार्यालय येथे महापालिका सामाजिक विभाग, ज्ञानदीप बहुउद्देशीय सामाजिक विकास संस्था ,शक्ती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंतीनिमित्त व्याख्यान आयोजित करण्यात आले होते यावेळी उपस्थितांसमोर आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी हडपसर क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत असणा-या सफाई कामगार, आरोग्य निरीक्षक, मनपाचे विविध कर्मचारी तसेच हडपसर मधील विविध वृत्तपत्राचे पत्रकार यांचा सन्मान चिन्ह, पुष्पगुच्छ, श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर व्याख्याते जगदीश ओव्हाळ, आयोजक सुरज गायकवाड, वसंत वाघमारे, डॉ.स्नेहल काळे, मनपा समाज विभाग रामदास चव्हाण, मनपा अतिक्रमण विभाग धम्मानंद गायकवाड, भारत गायकवाड,वरिष्ठ आरोग्य निरीक्षक संजय घनवट, आरोग्य निरीक्षक नितीन कांबळे , नवनाथ शेलार, ॲड. नितीन कदम, नरेंद्र आल्हाट, दत्तात्रय पोळ, विकास मोरे, प्रवीण शितोळे, राजेश दरेकर,विकास सकट,अमोल गायकवाड, भाऊ खांदवे, लिंबोनी वाघमारे , मनपा सामाजिक विभागाचे तसेच मनपा कर्मचारी, सफाई कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठा आरक्षणाबाबत तुम्ही गप्प का?

## अशोक चव्हाण यांच्या सभेत आंदोलकांची घोषणाबाजी

**नांदेड : प्रतिनिधी**

नांदेड येथील महायुती उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या खासदार अशोक चव्हाण यांच्या सभेत मराठा आंदोलकांनी आरक्षणाच्या प्रश्नावर जाब विचारत जोरदार घोषणाबाजी केली. भाषण थांबावून चव्हाण यांनी त्यांचे निवेदन स्वीकारल्यानंतर सभा सुरळीत पार पडली.

केंद्रात आणि राज्यात भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेवर असल्याने पक्षातील विशेषतः मराठा समाजाच्या नेत्यांना मराठा आरक्षणाबाबत जाब विचारला जात आहे. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काँग्रेस सोडून भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यांना पक्षाकडून राज्यसभा सदस्यत्वही देण्यात आले आहे. त्यामुळे मराठा समाजाच्या रोषाला सामोरे जाण्याची वेळ त्यांच्यावर येत आहे. यापूर्वी त्यांचे वाहन अडविण्याचा प्रकारही घडला आहे.

# एअर इंडियाची तेलअवीवची सर्व उड्डाणे ३० एप्रिलपर्यंत रद्द




टाटा समूहाच्या मालकीच्या एअर इंडिया या आघाडीच्या विमानसेवा कंपनीनं शुक्रवारी माहिती दिली की आखाती देशांमधील सद्यपरिस्थिती लक्षात घेता इस्रायलच्या तेल अवीव मधून कंपनीची सर्व उड्डाणं ३० एप्रिल २०२४ पर्यत रद्द केली आहेत.

एअर इंडियानं एक पत्रक जाहीर करत माहिती दिली आहे की ''आखातातील गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन तेल अवीव मधून होणारी आमची उड्डाणं ३० एप्रिल २०२४ पर्यत रद्द करण्यात आली आहेत. परिस्थितीवर आम्ही सातत्याने लक्ष ठेवून आहोत. मात्र अशा वेळी या कालावधीत ज्या प्रवाशांनी आमच्या कंपनीची तिकिटं बुक केली आहेत, त्यांना या कालावधीनंतर पुन्हा एकदा मोफत तिकिट बुकिंग (वन टाइम फ्री रिशेड्युल) करता येणार आहे किंवा तिकिट रद्द करायचे असल्यास तो पर्यायदेखील उपलब्ध असणार आहे. आम्हाला ही गोष्ट पुन्हा एकदा अधोरेखित करायची आहे की आमच्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेला आमचं सर्वोच्च प्राधान्य आहे.''

१३ एप्रिलला इराणने इस्रायलवर ३०० ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा हल्ला केला होता. मात्र यातील बहुतांश ड्रोन किंवा क्षेपणास्त्रे निशाण्यावर पोचण्याधीच इस्रायलनं हवेतच उडवली होती. इराणने पहिल्यांदाच आपल्या भूमीतून इस्रायलवर थेट हल्ला केला होता.

१ एप्रिलला इराणच्या सीरियातील दूतावासावर हल्ला झाला होता. त्यामध्ये १३ लोकांचा मृत्यू झाला होता. यामध्ये इराणच्या रेव्होल्युशनरी गार्डचा वरिष्ठ कमांडर आणि काही टॉप अधिकारी मारले गेले होते. हा हल्ला इस्रायलनंच केला होता असं मानण्यात येतं आहे.

## इस्रायलच्या इराणवरील हल्ल्याबद्दल अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्र्यांचं मौन

काल रात्री इस्रायलने इराणच्या इस्फहानवर क्षेपणास्त्र डागलं. इराणवरील या क्षेपणास्त्र हल्ल्याबाबत अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री अँटनी ब्लिंकन यांनी कोणतंही विधान केलेलं नाही.

शुक्रवारी पत्रकारांनी त्यांना विचारलं की, इस्रायल आणि इराणच्या प्रतिक्रिया मोजून मापून दिलेल्या आहेत, याचा अर्थ मोठा संघर्ष टळला आहे का? ब्लिंकन यांना असंही विचारण्यात आलं की, राफाहबाबत अमेरिकेची भूमिका काय आहे?

इस्रायलच्या इराणवरील हल्ल्याबद्दल अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्र्यांचं मौनफोटो स्रोत,ठएणढएठड

या प्रश्नांच्या उत्तरात ते म्हणाले, तणाव कमी करण्यावर त्यांचा भर असून संबंधित पक्षांना संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे. बीबीसीच्या प्रतिनिधी जेसिका पार्कर यांनी ब्लिंकन यांना विचारलं की काल रात्री घडलेल्या घटनेबद्दल तुम्ही काही विधान का केलेलं नाही?

यावर ते म्हणाले, मी जे काही बोलेन ते रटाळवाणंच असेल असं म्हणत त्यांनी पुन्हा काही बोलण्यास नकार दिला. मात्र त्यांनी पुनरुच्चार केला की अमेरिका कोणत्याही प्रकारच्या लष्करी कारवाईत सहभागी नसेल आणि तणाव कमी करण्यासाठी आम्ही काम करत राहू. इराणनेही या हल्ल्याकडे फारसं लक्ष दिलेलं नाही. या हल्ल्याबाबत इस्रायलने अद्याप कोणतंही वक्तव्य केलेलं नाही.

## पुरानंतर दुबई एअरपोर्टवरील उड्डाणे पुन्हा सुरू

संयुक्त अरब अमिरात आणि जवळपासच्या देशांमध्ये झालेल्या प्रचंड पावसामुळं दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील हवाई वाहतुकीवर परिणाम झाला होता.

मंगळवारी वादळ आणि जोरदार पावसामुळं युएईच्या रस्त्यांसह विमानतळावरही सगळीकडं पाणीच पाणी साचलं होतं. ओमानमध्ये पूरपरिस्थितीमुळं २० जणांचा मृत्यू झाला. तर यूएईमध्ये एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे.

दरम्यान, गुरुवारी दुबई एअरपोर्टवर येणाऱ्या काही विमानांसाठी पुन्हा विमानतळ सुरू करण्यात आलं. पण प्रचंड व्यस्त असणाऱ्या या विमानतळावर अद्याप हवाई वाहतूक पूर्ववत होऊ शकलेली नाही.

जगात दुसऱ्या क्रमांकाचं सर्वात व्यस्त विमानतळ असलेल्या दुबई विमानतळाच्या अधिकाऱ्यांनी गुरुवारी टर्मिनल १ वर विदेशातून येणाऱ्या विमानांना परवानगी दिली जात असल्याची माहिती दिली. पण दुबईतून उड्डाण घेणाऱ्या विमानांचं वेळापत्रक अद्याप कोलमडलेलंच आहे. त्यानंतर अधिकाऱ्यांनी एमिरेट्स आणि फ्लायदुबई या सर्वात मोठ्या एअरलाइनच्या उड्डाणांसाठी टर्मिनल ३ वर चेक इन सुरू असल्याची घोषणा केली होती. पण विमाानांची वाट पाहणाऱ्यांची संख्या पाहता उड्डाणांचा विलंब होणार असल्याचा इशारा आधीच देण्यात आला आहे.

# अरविंद केजरीवाल यांची तुरुंगात इन्सुलिन देण्याची मागणी, न्यायालयात याचिका दाखल



केजरीवाल हे तुरुंगात मिठाई, आंबे, साखर, बटाटे खात आहेत. त्यांना मधुमेहाचा त्रास आहे. तरीही त्यांची शुगर वाढावी यासाठी अरविंद केजरीवाल वेगवेगळे प्रयत्न करत असल्याचा आरोप ईडीने केला आहे.

अरविंद केजरीवाल यांचा तुरुंगात छळ होत असल्याचा आरोप आप नेत्यांनी केला आहे.

दिल्ली सरकारच्या कथित मध्य धोरण घोटाळ्याप्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सक्तवसुली संचालनालयाने अटक केली असून केजरीवाल हे सध्या तिहार तुरुंगात आहेत. केजरीवाल यांना सुरुवातीला १५ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली होती. मात्र १५ एप्रिल रोजी त्यांना ईडीने न्यायालयासमोर हजर केलं आणि चौकशीसाठी आणखी काही दिवसांच्या कोठडीची मागणी केली. न्यायालयाने ही मागणी मान्य करत त्यांच्या कोठडीत २३ एप्रिलपर्यंत वाढ केली आहे. केजरीवाल यांना मध्य धोरण घोटाळ्याप्रकरणी २१ मार्चच्या रात्री अटक करण्यात आली होती. त्यानंतर त्यांचा जामीनही नाकारण्यात आला होता.

दरम्यान, अरविंद केजरीवाल यांचा तुरुंगात छळ होत असल्याचा आरोप आप नेत्यांनी केला आहे. तसेच केजरीवाल यांना त्यांचे कुटुंबीय आणि इतर सहकाऱ्यांना समोरासमोर भेटू दिलं जात नसल्याचा दावा आपने केला आहे. केजरीवाल यांना उच्च मधुमेहाचा (हाय डायबिटीज) त्रास आहे. तसेच तुरुंगात रवानगी झाल्यापासून केजरीवाल यांचं वजनदेखील झपाट्याने कमी होत असल्याचा दावा आप नेत्यांनी केला आहे. त्यांना औषधंदेखील दिली जात नसल्याचा आरोप आपने केला आहे.

दुसऱ्या बाजूला, ईडीनेही केजरीवाल यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. केजरीवाल हे तुरुंगात मिठाई, आंबे, साखर, बटाटे खात आहेत. त्यांना मधुमेहाचा त्रास आहे. तरीही त्यांची शुगर वाढावी यासाठी अरविंद केजरीवाल वेगवेगळे प्रयत्न करत असल्याचा आरोप ईडीने केला आहे. त्याद्वारे जामीन मिळवण्याचा प्रयत्न केजरीवाल करत आहेत असा आरोप ईडीने केला आहे. केजरीवालांच्या डाएट आणि आरोग्यावरून आरोप प्रत्यारोप होत असतानाच त्यांनी राऊस अव्हेन्यू न्यायालयात एक याचिका दाखल केली आहे. या याचिकेद्वारे केजरीवाल यांनी न्यायालयाकडे मागणी केली आहे की, त्यांना तिहार तुरुंगात इन्सुलिन दिलं जावं. केजरीवालांच्या या याचिकेवर आज (१९ एप्रिल) सुनावणी होणार आहे.

ईडीने म्हटलं आहे की, केजरीवाल तुरुंगात असे पदार्थ खातायत जे टाईप टू डायबिटीज असलेल्या रुग्णासाठी धोकादायक आहेत. ते दररोज गोड चहा पित आहेत, मिठाई खात आहेत. ईडीने केजरीवाल यांचा तुरुंगातील १७ दिवसांचा डाएट चार्टदेखील जारी केला आहे. दरम्यान, ईडीने केलेले सर्व आरोप केजरीवालांच्या वकिलांनी फेटाळून लावले आहेत. केजरीवालांच्या वकिलांनी म्हटलं आहे की, ईडी हे सगळे दावे केवळ माध्यमांचं लक्ष वेधून घेण्यासाठी करत आहे.

# स्कॉटलंडमधून वाईट बातमी, दोन भारतीय विद्यार्थ्यांचा मृत्यू

अमेरिकेपाठोपाठ आता स्कॉटलंडमधून भारतीयांसाठी वाईट बातमी आली आहे. गेल्या काही महिन्यांपासून अमेरिकेत सातत्याने भारतीय विद्यार्थी आणि भारतीय वंशाच्या लोकांच्या हत्या होत असतानाच स्कॉटलंडमधून दोन भारतीय विद्यार्थ्यांच्या मृत्यूची बातमी समोर आली आहे. दोन्ही विद्यार्थ्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. स्कॉटलंडमधील एका पर्यटनस्थळी दोघांचे मृतदेह सापडले आहेत. बुधवारी रात्री लिन ऑफ टम्मेल (ङळपप ेष ढीाशश्र थरींशीषरश्रश्र) या धबधब्याजवळ दोघांचे मृतदेह सापडले. स्कॉटलंडच्या उत्तर-पश्चिम भागात गॅरी आणि टम्मेल नदीच्या संगमाजवळ हा धबधबा आहे. हे दोन्ही विद्यार्थी त्यांच्या चार मित्रांबरोबर फिरण्यासाठी या धबधब्याजवळ गेले होते.

स्थानिक माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार चार विद्यार्थी ट्रेकिंग करण्यासाठी लिन ऑफ टम्मेल धबधब्यावर गेले होते. त्यांच्यापैकी दोन जण पाण्यात पडले. नदीच्या पाण्यात बुडून या दोघांचा मृत्यू झाला. मृत विद्यार्थ्यांच्या मित्रांनी आपत्कालीन सेवा पुरवणाऱ्या संस्थेला आणि पोलिसांना फोन करून या घटनेची माहिती दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि बचाव पथक घटनास्थळी दाखल झालं. त्यानंतर बचाव मोहीम हाती घेण्यात आली. बचाव पथकांनी बुधवारी रात्री दोघांचे मृतदेह शोधून पाण्याबाहेर काढले. या अपघातात मृत्यू झालेले दोन्ही विद्यार्थी स्कॉटलंडच्या डुंडी विद्यापीठात पदव्युत्तर पदवीचं शिक्षण घेत होते.

या घटनेची माहिती देताना पोलिसांनी सांगितलं की, २६ वर्षीय जितेंद्रनाथ कस्तुरी आणि २२ वर्षीय चाणक्य बोलिसेट्टी हे दोघे त्यांच्या आणखी दोन मित्रांबरोबर लिन ऑफ टम्मेल धबधब्यावर फिरण्यासाठी गेले होते. त्यावेळी जीतेंद्रनाथ आणि चाणक्य हे दोघे पाण्यात पडले आणि दोघांचाही बुडून मृत्यू झाला. हे अपघाती मृत्यू असून यामागे इतर कुठलंही कारण नाही. दरम्यान, या दुर्दैवी घटनेनंतर डुंडी विद्यापीठाने सर्व प्रकारची मदत करण्याचं आश्वासन दिलं आहे.

लंडनमधील भारतीय उच्चाधिकाऱ्यांनी सांगितलं की, धबधब्याच्या पाण्यातून दोन्ही विद्यार्थ्यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. एका अधिकाऱ्याने सांगितलं की, भारतीय वाणिज्य दूतावासाने दोन्ही विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांशी संपर्क साधला आहे. तसेच दूतावासाच्या एका प्रतिनिधीने ब्रिटनमध्ये राहणाऱ्या आणखी एका विद्यार्थ्याची भेट घेतली आहे. शुक्रवारी दोन्ही विद्यार्थ्यांच्या मृतदेहांचे शवविच्छेदन केलं जाणार असून त्यानंतर अधिकारी त्यांचा मृतदेह भारतात पाठवण्याची प्रक्रिया चालू करतील.

## इराणच्या ताब्यात असलेल्या जहाजावर काम करणारी महिला भारतात परतली

इराणच्या ताब्यात असलेल्या जहाजावर काम करणारी महिला भारतात परतलीइराणच्या ताब्यात असलेल्या मालवाहू जहाज एमएससी एरिजवर काम करणारी महिला एन. टेसा जोसेफ भारतात परतली आहे. ती मूळची केरळची आहे.१३ एप्रिल रोजी हे जहाज इराणच्या नौदलानं ताब्यात घेतलं होतं. हे जहाज भारतात येत होतं. यावर जहाज चालक दलातील २५ लोकआहेत. त्यात १७ भारतीयआहेत. या लोकांची तात्काळ सुटका व्हावी अशी मागणी त्या लोकांच्या नातलगांनी केली होती.

भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने आपला तेहरान दुतावास उर्वरित १६ जणांच्या सुटकेसाठी चर्चा करत आहे अशी माहिती दिली. हे सर्व लोक सुखरुप असून त्यांना आपल्या नातलगांशी बोलू दिलं जात असल्याचंही स्पष्ट करण्यात आलं आहे. भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी इराणचे परराष्ट्रमंत्री आमिर अब्दोल्लाहाइ यांच्याशी चर्चा केली आहे असंही मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

# इस्रायल-इराण युद्धावर एलॉन मस्क यांची लक्षवेधी प्रतिक्रिया



इस्रायल-इराण युद्धावर एलॉन मस्क यांची महत्त्वाची प्रतिक्रिया समोर आली आहे.

इस्रायल विरुद्ध हमास युद्धाला सहा महिने पूर्ण होत नाहीत, तोवरच आता इस्रायल आणि इराण यांच्यात संघर्ष पेटला आहे. इराणने दोन दिवसांपूर्वी अनेक क्षेपणास्त्र इस्रायलवर डागले होते. त्यानंतर आता इस्रायकडूनही जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले आहे. मध्य इराणच्या इसफहान शहरावर इस्रायलने क्षेपणास्त्र सोडल्याची बातमी समोर येत आहे. त्यानंतर शुक्रवारी स्पेसएक्स, टेस्ला आणि सोशल मायक्रोब्लॉगिंग एक्स या साईट्सचे प्रमुख असलेल्या एलॉन मस्क यांनी या संघर्षावर लक्षवेधी अशी प्रतिक्रिया दिली आहे. एकप्रकारे दोन्ही देशांनी शांतता ठेवावी, असाच अर्थ मस्क यांच्या प्रतिक्रियेतून ध्वनित होत आहे.

काय म्हणाले एलॉन मस्क?

एलॉन मस्क हे उपरोधिक पोस्ट टाकण्यासाठी चांगलेच प्रसिद्ध आहेत. ते स्वतःवरही कधी कधी उपरोधिक पोस्ट करतात. यावेळी त्यांनी एक्सवर टाकलेल्या पोस्टमध्ये गंभीर विवेचन केले आहे. आपण एकमेकांवर क्षेपणास्त्र (रॉकेट) डागण्यापेक्षा, ते परग्रहांवर पाठवायला हवेत, अशी प्रतिक्रिया मस्क यांनी दिली आहे. तसेच मजकुरासह त्यांनी स्पेसएक्सने अवकाशात प्रक्षेपित केलेल्या रॉकेटचा एक फोटो जोडला आहे.

युद्धापेक्षा जागतिक नेत्यांनी मिम्स पाठवावेत

टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तात एलॉन मस्क यांची आणखी एक प्रतिक्रिया देण्यात आली आहे. ज्यामध्ये मस्क म्हणतात, यापेक्षा जगातील नेत्यांनी एकमेकांना ईमेलवरून मिम्स पाठवावेत आणि जनतेला ठरवू द्यावे की कोण जिंकेल? युद्धापेक्षा मी कधीही अशा उपक्रमाला पाठिंबा देईल.

मस्क यांनी याआधी युक्रेन-रशिया आणि इस्रायल-हमास यांच्यात युद्ध छेडल्यानंतरही त्यावर भाष्य केले होते. जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींपैकी एक असलेल्या एलॉन मस्क यांनी आपली रोखठोक भूमिका व्यक्त करताना कधीही कच खाल्लेली नाही.

# मणिपूरमध्ये गोळीबार; ६७ टक्के मतदान

**इम्फाळ :** मणिपूरमध्ये सायंकाळी पाच वाजेपर्यंत ६७.४६ टक्के मतदान झाले. काही ठिकाणी गोळीबार आणि धमकावण्याच्या घटना घडल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. राज्यातील ६० पैकी ३२ विधानसभा मतदारसंघांचा समावेश असलेल्या इनर मणिपूर लोकसभा मतदारसंघात ७१.०१ टक्के मतदानाची नोंद झाली, तर २८ पैकी १५ विधानसभा मतदारसंघ मिळून बनलेल्या आउटर मणिपूर मतदारसंघात ६१.१२ टक्के मतदान झाले.

इनर मणिपूरअंतर्गत येणाऱ्या थौबल जिल्ह्यातील वांगखेम येथे सर्वाधिक ८२.४१ टक्के मतदान नोंदवले गेले. नागा व कुकी अशा दोन्ही समुदायांचे मतदार असलेल्या आउटर मणिपूरमधील चंदेल येथे ८५.५४ टक्के मतदान झाले.

इनर मणिपूर मतदारसंघात अनेक ठिकाणी गोळीबार आणि धमकावण्याच्या घटना घडल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. इम्फाळ पूर्व जिल्ह्यात खुराई मतदारसंघातील मोइरांगकाम्पू साजेब येथील एका मतदान केंद्राजवळ उभ्या असलेल्या ६५ वर्षांच्या एका इसमावर अनोळखी सशस्त्र लोकांनी गोळ्या झाडल्या. यात जखमी झालेल्या या इसमाला रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

बिष्णुपूर जिल्ह्यात मोइरांग विधनसभा मतदारसंघात येणाऱ्या थमनापोक्पी येथील एका मतदान केंद्राजवळ सशस्त्र लोकांनी हवेत गोळीबाराच्या अनेक फैरी झाडल्यामुळे मतदारांना पळून जावे लागले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी अतिरिक्त सुरक्षा कुमक तेथे पाठवण्यात आली. अनोळखी सशस्त्र लोकांनी निरनिराळ्या ठिकाणी एका विशिष्ट राजकीय पक्षाच्या निवडणूक एजंटना धमक्या दिल्या आणि त्यांना मतदान केंद्रातून निघून जायला सांगितले.

# क्लाऊड सीडिंगमुळे दुबईत पूर

दुबई शहर युनायटेड अरब अमिराती (ण-ए) च्या किनाऱ्यावर वसलंय आणि इथलं हवामान कोरडं आहे. वर्षभरात इथे सरासरी १०० मिलीमीटर (३.९ इंच) पेक्षाही कमी पाऊस पडतो. पण असं असलं तरी कधीतरी इथे अतिवृष्टीही होते.

दुबईपासून १०० किलोमीटरवरच्या अल-एन शहरात १६ एप्रिलच्या २४ तासांत २५६ मिमी पाऊस झाला.कमी दाबाच्या अनाहूत पट्ट्यामुळे गरम, आर्द्र हवा इथे जमा झाली पण बाकीच्या हवामान प्रणालींचा प्रभाव त्यानं कमी केला. त्यामुळे असा भरपूर पाऊस पडला

रीडिंग विद्यापीठातली प्राध्यापक मार्टिन अम्बॉम हवामान शास्त्रज्ञ आहेत आणि त्यांनी आखाती भागातल्या पावसाचा अभ्यास केलाय. ते सांगतात, जगाच्या या भागात दीर्घकाळ पावसाशिवाय जातो आणि मग अनियमित, मुसळधार पाऊस पडतो. पण असं असलं तरी आताचा पाऊस ही दुर्मिळ घटना होती.

अशाप्रकारे मुसळधार पाऊस पडण्यामागे हवामान बदलाचा हात किती आहे, हे नेमकं सांगता येणार नाही. त्यासाठी नैसर्गिक आणि मानवनिर्मित कारणांचा सखोल वैज्ञानिक अभ्यास होणं गरजेचं आहे आणि यासाठी अनेक महिने लागतील. पण सध्या झालेला रेकॉर्ड पाऊस हा हवामान बदल दाखवणारा आहे.

सोप्या भाषेत सांगायचं झालं तर गरम हवा जास्त आर्द्रता धरून ठेवते. दर डिग्री सेल्शियसमागे जवळपास ७% अधिक आर्द्रता साठवली जाते. परिणामी यामुळे पावसाची तीव्रता वाढते.

रेकॉर्डब्रेक पाऊस झाला, पण हे तापणाऱ्या वातावरणाशी सुसंगत आहे. कारण आर्द्रता वाढली की त्यामुळे वादळ तयार होतात आणि अतिवृष्टी - पूर येण्याच्या घटनांची शक्यता वाढते,

# ''ईव्हीएम बटण दाबताच भाजपला मतदान''

## सुप्रीम कोर्टाचे निवडणूक आयोगाला चौकशीचे आदेश!

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने आज निवडणूक आयोगाला डेमो दरम्यान केरळमध्ये कासरगोड लोकसभा मतदारसंघात भाजपला १ अधिक मतदान झाल्याच्या प्रकरणावर उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयात व्हीव्हीपॅटमधील मतदानाची १०० टक्के मोजणी केली जावी या मागणीसाठी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरु आहे. त्या दरम्यान याचिकाकर्त्यांचे वकील प्रशांत भूषण यांनी या घटनेचा उल्लेख केला.

याचिकाकर्त्यांच्या वतीने युक्तीवाद करताना ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी केरळमधील स्थानिक वृत्तपत्राच्या बातमीचा दखल देत लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर इव्हीएम मशीनच्या डेमो दरम्यान ४ इव्हीएम मशीनमध्ये भाजपला मत गेल्याचा दावा एलडीएफ आणि युडीएफ (ङशषीं ऊशोलीरींळल ऋीपीं (ङऊऋ) रपव ीहश णपळींशव ऊशोलीरींळल ऋीपीं (णऊऋ) च्या उमेदवाराने केला आहे. तसंच रिटर्नींग ऑफिसरकडे या संदर्भात तक्रार देखील केली आहे.

प्रशांत भूषण यांनी या प्रकरणाची बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली असता, या प्रकरणाची सुनावणी करत असलेल्या न्यायमुर्ती संजीव खन्ना आणि दिपांकर दत्ता यांच्या खंडपीठाने नक्की काय घडलंय याची चौकशी करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक प्रक्रियेचे पावित्र्य राखण्याच्या महत्त्वावर भर दिला आणि कोणत्याही शंका किंवा शंका दूर करण्यासाठी सर्व प्रक्रिया काटेकोरपणे पाळल्या गेल्याची खात्री करावी, असे म्हटले आहे.

याचिकाकर्त्यांनी उपस्थित केलेल्या चिंता

निजाम पाशा आणि प्रशांत भूषण यांच्यासह याचिकाकर्त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलांनी मतदारांची गोपनीयता आणि मतदान प्रक्रियेच्या पारदर्शकतेबद्दल चिंता व्यक्त केली. त्यांनी मतदारांना व्हीव्हीपीएटी स्लिप्स ठेवण्याची परवानगी द्यावी आणि मतदान प्रक्रियेदरम्यान व्हीव्हीपीएटी मशीनचे इलम्युनेशन निश्चित करण्याची वकिली केली. ज्येष्ठ अधिवक्ता संजय हेगडे यांनी मतमोजणी प्रक्रियेची विश्वासार्हता वाढवण्यासाठी स्वतंत्र ऑडिटची गरज अधोरेखित केली. केरळमधील मॉक पोल निकालांमधील कथित विसंगती यासारख्या अहवालांमध्ये उपस्थित झालेल्या चिंतेचे निराकरण करण्याच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला.

निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण

एउख ने सांगितले की, ततझअढ स्लिप मतदारांना बॉक्समध्ये सील करण्यापूर्वी सात सेकंदांसाठी दृश्यमान असतात. त्यांनी आश्वासन दिले की मतदान यंत्रे कठोर मॉक पोलमधून जातात आणि राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींच्या देखरेखीसह स्ट्राँगरूममध्ये सुरक्षितपणे साठवले जातात. तसेच मतदान यंत्रांच्या अखंडतेची पुष्टी केली, फर्मवेअरमध्ये बदल करता येणार नाही आणि छेडछाड रोखण्यासाठी कडक सुरक्षा उपाययोजना केल्या जात आहेत यावर भर दिला. त्यांनी मताची गुप्तता राखण्याच्या महत्त्वाचा पुनरुच्चार केला आणि स्ट्राँगरूम सील आणि उघडण्याच्या प्रक्रियेची रूपरेषा सांगितली.

ततझअढ आणि केस समजून घेणे

व्होटर व्हेरिफाईड पेपर ऑडिट ट्रायल (ततझअढ) मतदारांना त्यांचे मत अचूकपणे टाकले आहे की नाही हे व्हेरिफाय करण्यास सक्षम करते आणि विवाद निराकरणासाठी पेपर रेकॉर्ड प्रदान करते.

डीआरडीओ अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने स्वदेशी तंत्रज्ञाननिर्मित क्रूझ क्षेपणास्त्राची ओडिशाच्या किनारपट्टीवर केली यशस्वी उड्डाण चाचणी

नवी दिल्ली,१८ जुलै (पीएसआय)

संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेने (डीआरडीओ १८ एप्रिल २०२४ रोजी ओडिशाच्या किनारपट्टीवरील एकात्मिक चाचणी श्रेणी (आय टी आर ), चांदीपूर इथून स्वदेशी तंत्रज्ञाननिर्मित क्रूझ क्षेपणास्त्राची (आयटीसीएम ) यशस्वी उड्डाण चाचणी केली. चाचणीदरम्यान, सर्व उद्दिष्टे यशस्वीरित्या साध्य करण्यात आली. रडार, इलेक्ट्रो ऑप्टिकल ट्रॅकिंग सिस्टीम (एध्ऊए) आणि आयटीआर द्वारे वेगवेगळ्या ठिकाणी तैनात केलेल्या टेलीमेट्री सारख्या अनेक रेंज सेन्सर्सद्वारे क्षेपणास्त्राच्या कामगिरीचे परीक्षण करण्यात आले,ज्यामुळे उड्डाण मार्गाचा संपूर्ण माग घेता आला.तसेच भारतीय हवाई दलाच्या सुखोई (एल-३०-श्ज्ञ-६) विमानातूनही क्षेपणास्त्राच्या उड्डाणावर लक्ष ठेवण्यात आले.

क्षेपणास्त्राने वे पॉइंट नेव्हिगेशनचा (दिशादर्शन) वापर करून इच्छित मार्गाचा अवलंब केला आणि अत्यंत कमी उंचीवरील समुद्र-स्किमिंग उड्डाणाचे प्रात्यक्षिक केले. या यशस्वी उड्डाण चाचणीने बेंगळुरू येथील गॅस टर्बाइन रिसर्च एस्टॅब्लिशमेंटने,विकसित केलेल्या स्वदेशी प्रणोदन प्रणालीची विश्वसनीय कामगिरीदेखील सिद्ध केली आहे.

अधिक उत्तम आणि विश्वसनीय कामगिरी सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने हे क्षेपणास्त्र अत्याधुनिक वैमानिकी तंत्रे आणि सॉफ्टवेअर यांनी देखील सुसज्ज केले आहे.बेंगळूरूस्थित डीआरडीओ प्रयोगशाळेतील वैमानिकी विकास आस्थापनेने (एडीई) इतर प्रयोगशाळा तसेच भारतीय उद्योगांच्या योगदानासह हे क्षेपणास्त्र विकसित केले.

# जनतेचा विश्वास माझ्यासाठी 'जॅकपॉट' - उदयनराजे भोसले



**राजदंड / पाचगणी**

जनतेचा विश्वासच माझ्यासाठी जॅकपॉट आहे, त्यामुळे मी कोणत्याही परिणामाचा विचार करत नाही, माझ्या समोरचे उमेदवार भ्रष्टाचारी आहेत म्हणजे आहेतच, त्यामुळे माझा विजय हा निश्चित आहे, असे वक्तव्य खासदार श्री.छ. उदयनराजे भोसले यांनी उमेदवारी जाहीर होताच आ. शशिकांत शिंदे यांच्याबाबत केले आहे.

रायगाव ता.जावळी येथील सदिच्छा भेटीप्रसंगी ते बोलत होते.यावेळी , माजी पंचायत समिती सदस्य शिवाजी आप्पा गायकवाड, रायगाव सरपंच हसीना मुजावर , बाळासाहेब गोसावी नामदेव क्षीरसागर, उपसरपंच समाधान गायकवाड, नाझीम मुजावर ,उमाकांत जाधव, संदीप गायकवाड, वसंत क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना श्री भोसले म्हणाले, जर तुमच्यावर झालेले आरोप खोटे होते तर जामीन मिळवीण्यासाठी कोर्टात का गेला,कागद कधी खोटं बोलत नाहीत,ते खरेच असतात , त्यामुळे रडीचा डाव विरोधक खेळत आहेत अस तुम्ही म्हणताय पण हा रडीचा डाव तुम्हीच खेळत आहात हे लक्षात ठेवा.गांधी मैदानावर येऊन लोकांना हातात माईक द्यावा व त्यांच्या प्रश्नांना उत्तरे द्यावी म्हणजे सगळं खरं खोटं समजेल.

यावेळी शिवाजी गायकवाड बोलताना म्हणाले,विजय हा आपलाच असून काळजी करण्याचे कारण नाही.प्रजेच्या या दिलदार राजाला या विभागातून आम्ही जास्तीत जास्त मताधिक्य देऊन निवडून आणू.यावेळी बाळासाहेब गोसावी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. सरपंच हसीना मुजावर यांनी उदयनराजे यांचा सत्कार केला यावेळी मोठ्या संख्येने खासदार उदयनराजे भोसले प्रेमी, तसेच महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

# विरोधकांच्या रडीच्या डावाला जनता भूलणार नाही!

## आ. शशिकांत शिंदे; मतदारसंघातील प्रभाव पाहून व्यक्तिगत टीका



**राजदंड / सातारा**

गेली २५ वर्षे राजकारण, समाजकारण करताना आम्ही अत्यंत कष्टाने आणि स्वाभिमानाने उभे राहिलो आहे. आम्ही नेहमीच आमचा पक्ष व नेत्यांवर निष्ठा ठेवत सर्वसामान्यांचे प्रश्न मार्गी लावले आहेत. आमचा मतदारसंघातील प्रभाव पाहून आणि आमच्या कामावर काहीच बोलायला नसल्याने विरोधकांकडून रडीचा डाव खेळून आमच्यावर वैयक्तिक स्वरुपाचे खोटे आरोप सुरु केले आहेत. मतदारसंघातील जनता सुज्ञ असून विरोधकांच्या रडीच्या डावाला जनता भुलणार नाही, असा ठाम विश्वास सातारा लोकसभा मतदारसंघातील इंडिया आघाडीचे उमेदवार आ. शशिकांत शिंदे यांनी व्यक्त केला.

किकली (ता. वाई) येथे मतदारांशी संवाद साधताना आ. शिंदे बोलत होते. ते पुढे म्हणाले शशिकांत शिंदे काय आहेत हे जनतेला माहित आहे. आम्ही कधीही स्वार्थ साधला नाही. संघर्षातून आम्ही उभे राहिलो असून काही लोक आम्हाला नाहक त्रास देण्याचा प्रयत्न करत आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी झालेली गर्दी पाहून विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. निवडणुकांमध्ये आरोप - प्रत्यारोप होत असतात. मात्र काही जण व्यक्ती द्वेषातून आमच्यावर खालच्या पातळीवर आरोप करत आहेत. शरद पवारांच्या तालमीत तयार झालो असल्याने असल्या आरोपांना आम्ही घाबरणारे नाहीत. आम्हाला मतदारसंघातील जनतेचा विकास करायचा असून त्यामुळे आम्ही टीका टिपण्णी टाळून महत्वाच्या मुद्यांवर बोलणार आहे.

सध्या देशात, राज्यात असणाऱ्या सरकारकडून सर्वसामान्यांना नाहक त्रास दिला जात आहे. महागाइ, बेकारी, शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत सरकार उदासीन आहे. याउलट विरोधी पक्ष संपवण्याचे काम सरकारकडून होताना दिसत आहे. यंत्रणांचा गैरवापर करुन चुकीच्या पध्दतीने गुन्हे दाखल करुन विरोधकांना वेठीस धरण्याचे प्रकार होत आहे. मागील काही वर्षात जे काही घडले आहे ते जनतेने पाहिले असून जनतेनेच आता निवडणूक हातात घेतली आहे. गेली २५ वर्षांहून अधिक काळ मतदारसंघात काम केले असल्याने मतदारसंघात चांगला जनसंपर्क आहे. सातारा जिल्ह्यासह वाई तालुक्यातील सर्वसामान्य जनतेने मला भरभरून प्रेम दिले आहे. ज्येष्ठ नागरिक,महिला, युवक यांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे आ. शिंदे यांनी स्पष्ट केले.

किकली येथील श्री भैरवनाथ मंदिरात आ. शशिकांत शिंदे यांनी मनोभावे दर्शन घेत विधिवत पूजा केली. गावातील जेष्ठ मंडळींकडून शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान जांब (ता.वाई) येथे आ. शिंदे यांनी युवा सहकाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी सध्याच्या राजकीय स्थितीपासून तर वाढती बेरोजगारी, नोकरभरती तसंच सर्वच तरुणाईमध्ये ज्याच्याबाबत तीव्र संताप आहे ते महापोर्टल अशा अनेक वेगवेगळ्या प्रश्नांवर आ. शिंदे यांनी आवाज उठवला. हे प्रश्न सोडवण्यास प्राधान्य देवू अशी ग्वाही त्यांनी दिली.भुईंज आणि ओझर्डे ग्रामस्थांच्या असणाऱ्या विकासकामांबाबत भूमिका जाणून घेत आगामी काळात निश्चितच पूर्ण केल्या जातील, असा विश्वास आ. शिंदे यांनी उपस्थित ग्रामस्थांना दिला.

### आ. शशिकांत शिंदे - मदन भोसले भेट

सातारा लोकसभा निवडणूक प्रचार निमित्ताने गुरुवारी सकाळी भुईंज येथे महालक्ष्मी देवीचे तसेच प्रभू श्रीरामाचे आ. शशिकांत शिंदे यांनी दर्शन घेतले. दादा जाधवराव यांच्या निवासस्थानी भेट देण्यासाठी आ. शिंदे गेले असता तेथे माजी आमदार मदन भोसले यांची भेट झाली.

# माढ्याचा खासदार प्रहार जनशक्ती संघटन ठरविणार

## सातारा येथे 'प्रहार'चे पदाधिकारी व दिव्यांग,कामगारांच्या बैठकीत निर्णय




**राजदंड / सातारा**

सातारा व माढा लोकसभा मतदारसंघात प्रहार जनशक्ती पक्षाचे मोठी ताकद आहे दिव्यांगासाठी काम करताना प्रहार ने दोन्ही मतदारसंघात कार्यकर्त्यांचे मोठे जाळे तयार केले आहे त्यामुळे येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत सातारा व माढा लोकसभा मतदारसंघात प्रहारची भूमिका महत्वाची ठरणार असल्याचे प्रतिपादन गौरव जाधव यांनी केले.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रहार जनशक्ती पक्षाचे पदाधिकारी व दिव्यांग संघटनेचे पदाधिकारी यांची सातारा दूध संघ हॉल येथे बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी प्रहारचे राज्य समन्वयक व माननीय बच्चुभाऊ कडू यांचे स्वीय सहाय्यक गौरव जाधव अरविंद पिसे शिवाजी चव्हाण मनोज माळी शुभम उबाळे विजय मोरे नंदकुमार पवार आनंदा पोतेकर भानुदास दांगडे मनोज भैय्या माळी प्रवीण शिंदे बंटी भाऊ मोरे समीना शेख विद्या कारंडे ऍड काजी इत्यादी सह पदाधिकारी उपस्थित होते.

गौरव जाधव म्हणाले आमदार माननीय बच्चुभाऊ कडू महायुतीत आहेत मात्र महायुती कडून बच्चू भाऊ कडू यांना मिळणारे वागणूक आपल्याला माहिती आहे. तरी सातारा व माढा लोकसभा मतदारसंघात पक्ष आदेश देतील त्याप्रमाणे काम करणार आहे. तरी दिव्यांग कष्टकरी कामगार व युवकांसाठी काम करणाऱ्या उमेदवाराच्या पाठीमागे प्रहार जनशक्ती पक्षाची ताकद उभी करण्यात येणार आहे.

सातारा जिल्ह्यात एक लाखाहून अधिक दिव्यांग आहेत हे सर्व दिव्यांग प्रहारशी निगडित आहेत त्यामुळे पक्षाचे कार्यकर्ते व दिव्यांग व त्यांचे कुटुंबीय आदेशाची वाट पाहत आहेत. प्रहार जर एखाद्या उमेदवाराला निवडून आणू शकतो तर गोरगरीब जनतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणाऱ्या उमेदवाराला पाडण्याची ताकद ही प्रहारमध्ये असल्याचे गौरव जाधव म्हणाले.

### महिलेची गळफास घेवून आत्महत्या

**राजदंड / सातारा**

साताऱ्यातील नवीन एमआयडीसी परिसरात राहणाऱ्या एका महिलेने गळफास घेवून आत्महत्या केल्याची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, आकांक्षा सुहास निंबाळकर (वय २५, रा. नवीन एमआयडीसी, सातारा) यांनी गळफास घेवून आत्महत्या केली. ही घटना दि. १६ एप्रिल रोजी घडली असून सातारा शहर पोलीस ठाण्यात याची नोंद झाली आहे.

# पाणी मिळत नसल्याने प्राधिकरण कार्यालयातच 'तू तू - मैं मैं'

■ माजी नगराध्यक्ष अनिता चोपडे यांच्या नेतृत्वाखाली संतप्त ग्राहकांनी दिले निवेदन



**राजदंड / वाई**

पाचगणीत अनियमित पाणी पुरवठ्याने नागरिक हैराण झाले असतानाच काही विभागात जीवन प्राधिकरणच्या मनमानी कारभाराने पाणी मिळत नसल्याच्या तक्रारीने नागरिकांची प्राधिकरण कार्यालयातच तू तू मैं मैं पाहायला मिळाली. यात अधिकाऱ्यांनी मात्र बोटचेपे धोरण घेतल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की महाबळेश्वर येथील वेण्णा लेक मधून पाचगणीला पाणी पुरवठा होत आहे. सध्या लेक मधील पाणी कमी झाल्याने आगोदरच पाण्याची ओरड असतानाच शाहूनगर येथे ज्या विभागाला पाणी मिळत नव्हते त्या विभागाला पाणी पुरविण्याच्या नादात ज्या विभागाला पणाई मिळत होते त्या विभागाला पाणी बंद झाल्याने त्या विभागातील माजी नगराध्यक्षा अनिता चोपडे यांनी त्रस्त होऊन काल नागरिकांना घेवून प्राधिकरण कार्यालयात अधिकाऱ्यांना जाब विचारला. यावेळी त्यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी' आजार रेड्याला आणि इंजेक्शन पखालीला 'अशी परिस्थिती केल्याने आम्हाला पाणी मिळत नसल्याचे सांगितले व पाणी सर्वांना मिळाले पाहिजे ही आमची भूमिका मांडली. परंतु या ठिकाणी कार्यालयातच नागरिकांमध्ये तू तू मैं मैं परिस्थिती निर्माण झाली. अधिकारी आणि कर्मचारी यांच्यातील समन्वयाअभावी ज्या ठिकाणी पाण्याच्या पाईपमध्ये बिघाड आहे ते दुरुस्त करण्याऐवजी दुसरीकडेच दुरुस्ती करून ज्या भागाला पाणी मिळत होते त्यांना पाणी बंद झाल्याने नागरिक संतप्त झाले. याबाबत या अनिता चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांनी प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना निवेदन दिले यामध्ये तातडीने दुरुस्ती करावी अन्यथा आम्ही आंदोलन करू असा इशारा दिला आहे. यावर शाहूनगर परिसरातील ग्राहकांच्या सह्या आहेत.

> "उन्हाळ्यात पाणीटंचाई असताना मिळणारे तुटपुंजे पाणी हे सर्वांना मिळाले पाहिजे, अशी आमची मागणी आहे; परंतु अधिकाऱ्यांनी जिथं बिघाड आहे त्याची पहिल्यांदा दुरूस्ती करावी.
> – अनिता चोपडे, माजी नगराध्यक्ष

# शेखर गोरे यांच्या कार्यकर्ता संवाद मेळाव्यास मोठा प्रतिसाद

■ मतदारसंघात 'बंटी आणि बबली' दोन लबाड माणसं फिरत असल्याचे वक्तव्य



**राजदंड / वडूज**

मागील आठ दिवसांपासून शेखर गोरें यांच्या भाजपचे उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर, महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांनी भेटी घेतल्या तर राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी शेखरभाऊ गोरेंना थेट गोविंदबागेत निमंत्रण धाडलं. मोठया सन्मानाची वागणूक देत मोठया साहेबांनी.... शेखर तुम्ही जर २०१९ ला घड्याळ चिन्हावर लढला असता तर तेव्हाच आमदार झाला असता, असं वक्तव्य केलं. मात्र, यावेळी नक्की विचार केला जाईल, असा ठाम शब्द दिल्याने आणि हाच शब्द शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यापर्यंत पोहोचला जाईल याची खात्री मिळाल्याने शेखरभाऊंनी पुन्हा आघाडी धर्म पाळत असल्याचं सूतोवाच वडूज, ता. खटाव येथील प्रमुख कार्यकर्ता मेळाव्यात केले.

शेखरभाऊ गोरे प्रतिष्ठानच्या वतीने खटाव तालुक्यातील शेखरभाऊ प्रेमी कार्यकर्त्यांच्या संवाद मेळाव्याचं वडूज येथे आयोजन करण्यात आलं होतं.

मतदार संघात 'बंटी आणि बबली' दोन लबाड माणसं फिरत असून त्यांच्या पासून सावध रहा, अशी टीका शेखरभाऊ गोरेंनी खासदार रणजितसिंह निंबाळकर आणि आमदार जयकुमार गोरें यांच्यावर केली. याच वेळी साडेचार वर्षानंतर तुमच्या भेटीला येवूनही तुम्ही हजारोच्या संख्येने उपस्थित राहून नादखुळं प्रेम दाखवलं याबद्दल मी प्रथम तुमची माफी मागतो असं म्हणत शेखरभाऊ भावनिक झाले.मात्र यावेळी कार्यकर्त्यांनी हात उंचावत आम्ही तुमच्या पाठीशी कायम असल्याचं सांगून घोषणा बाजी केली.

मेळाव्यात राजू जाधव, गणेश चव्हाण, राजीव चव्हाण, वैभव महाराज आदींसह अनेक कार्यकर्त्यांनी मनोगतं व्यक्त केली.

# संशयित माल जवळ बाळगल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**राजदंड / सातारा**

संशयित माल जवळ बाळगल्याप्रकरणी एकाविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, पोलिसांची गस्त सुरु असताना एकाकडे असलेली दुचाकी व वेल्डींग मशीन असल्याचे आढळून आले. संबंधितास त्याबाबत पोलिसांनी माहिती विचारल्यानंतर त्याबाबत योग्य उत्तर न दिल्याने त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. जीवन शहाजी रावते (वय २४, रा. एमआयडीसी परिसर, सातारा) याच्या विरुध्द पोलिसाने तक्रार दिली आहे. ही कारवाई दि. १६ एप्रिल रोजी करण्यात आली आहे.

# धोम-बलकवडीचे पाणी न सोडल्यास उपोषण

## खंडाळ्याच्या तहसिलदारांना शेतकऱ्यांचे निवेदन

**राजदंड / खंडाळा**

धोम-बलकवडीच्या कालव्यातून खंडाळा तालुक्यासाठी आवर्तन न सोडल्यास २२ पासून तहसिल कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

खंडाळा तालुक्यातील विविध गावच्या शेतकऱ्यांनी सोमवारी धोम बलकवडी कालव्यांचे आवर्तन सोडण्यासाठी खंडाळ्याचे तहसिलदार अजित पाटील यांना निवेदन दिलेले होते. त्यावर संबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यांशी जिल्हाधिकारी यांच्या दालनात बैठक पार पडली. त्यामध्ये संबधित अधिकाऱ्यांना दोन दिवसांमध्ये खंडाळा तालुक्यासाठी आवर्तन सोडावे असे तोंडी आदेश दिले होते असे निवेदनात म्हटले आहे.

तालुक्यातील शेतकऱ्यांनी धोम बलकवडी धरणांतील पाणी साठ्याची आणि पाणी सोडण्याची प्रत्यक्ष पाहणी केली असता तालुक्याला आवर्तन सोडण्यासाठी दोन्ही धरणामध्ये पाणीसाठा उपलब्ध असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. मात्र, संबंधित विभागाचे अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता कोणतेही आदेश प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे आम्ही खंडाळा तालुकावासियांना कोणत्याही प्रकारचे आवर्तन सोडू शकत नाही असे सांगण्यात आले.

दरम्यान, गुरुवारी सर्व शेतकऱ्यांनी तहसिलदार अजित पाटील यांच्याकडे पाणी सोडणेबाबत विचारणा केली. त्यावर श्री.पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या कार्यालयातील शिंदे यांना दुरध्वनी वरुन संपर्क केले असता दोन ते तीन दिवसामध्ये खंडाळा तालुक्यासाठी धोम बलकवडी कालव्याचे आवर्तन सोडू असे तोंडी सांगितले.

शनिवार दि.२१ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत धोम बलकवडी कालव्याचे आवर्तन न सोडलेस २२ पासून तहसिल कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याचा इशारा निवेदनाव्दारे देण्यात आला आहे.

# लगीनघाई सुरू... पण शेतकरी नवरा नको गं बाई...!

## लग्न जुळविताना आई-वडिलांसह नातेवाईकांची कसरत



**उंब्रज/अनिल कदम**

अवकाळी, महापूर किंवा दुष्काळ अशा निसर्गाच्या अवकृपेने बळीराजाला अस्मानी व सुलतानी संकटाला सामोरे जावे लागत आहे. राज्य आणि केंद्र सरकारकडून उपाययोजना होत नसल्याने शेतकरी अधोगतीला लागला आहे. मात्र, शहरी डामडौल आणि दिखाऊ श्रीमंती हेच सर्वस्व समजणाऱ्या मुलींचीही संख्या कमी नाही. परिणामी, शेतकरी नवरा त्यांना सुरक्षित वाटत नाही. यामुळे लगीनघाई सुरू पण शेतकरी नवरा नको ग बाई.... ! असा सूर आळवला जात असल्याने लग्न जुळविताना आई-वडिलांसह नातेवाईकांची कसरत होत आहे.

त्यामुळे विवाहयोग्य मुली जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकरी मुलाला कमी प्रतिष्ठेचे समजून शासकीय नोकरदाराला पसंती देत असून शेतकरी मुलाला चक्क नकार देत असल्याचे दिसून येते आहे. बहुतांश मुलींकडून तर मुलाच्या घरी शेती पाहिजे, पण शेतकरी नवरा नको! अशी विचित्र अपेक्षा व्यक्त होतांना दिसून येत आहे. कोरोनाच्या काळात शहरात गेलेले तरुण मुले गावी परत आले होते. त्यातील काही तरुण परतले तर काही तरुण गावी थांबले. काहींच्या नोकऱ्या गेल्या त्यामुळे बेरोजगारी वाढली असून कित्येक तरुणांचे लग्न जोडणे अवघड झाले आहे. ग्रामीण भागातील अल्पभूधारक शेतकरी, मजुरवर्ग आदी कुटुंबातील युवकांचे वय वाढत आहे. मुलगा मुलगी पाहायला गेल्यावर मुलीच्या कुटुंबाकडून मुलाला नोकरी आहे का? असा प्रश्न असतोच! सरकारी नोकरीच्या मुलांची चलती असल्याने बाकीच्यांना लग्न जुळविण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. अर्धवट शिक्षण घेऊन शेती व इतर उद्योग व्यवसाय करणाऱ्या तरुणांना अनेक अडचणीला सामोरे जावे लागत आहे. पर्यायी जवळच्या नसल्याची बाब समोर आली नात्यातील मुलींची शोधाशोध केली जात आहे. परंतु, नातेवाईक मुलगी देण्यास तयार नसल्याची बाब समोर आली आहे. निसर्गाच्या अवकृपेने व शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांची बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रत्येक पित्याला मुलगी चांगल्या घरी नांदावी, असे वाटते. ग्रामीण भागातील मुलींच्या पित्याची नजर शहरी भागातील मुलांकडे वळली आहे. श्रीमंत असो वा गरीब असो शेतकरी मुलाला मुलगी देण्यास पिता नकार देत आहे.

■ **शेतकरी युवकांत नैराश्य**

शिकलेल्या मुली लग्नासाठी नोकरी असणाऱ्या मुलांना प्राधान्य देत आहे. पण शिकून शेती व्यवसायात राहिलेल्या शेतकरी मुलांना लग्नासाठी मुली देण्यास बहुतांश पालक पुढे येत नसल्याचे चित्र निर्माण होत आहे. शेतकरी मुलांना लग्नासाठी वर्षानुवर्षे मुली बघण्यात वेळ घालावा लागत आहे. ४० वर्षे उलटून गेली तरी काही तरुण लग्न जुळविण्यासाठी धडपडत आहे. लग्न ठरत नसल्याने या शेतकरी युवकांत नैराश्य, व्यसनाधीनता वाढत आहे.

■ **मुला-मुलींच्या अपेक्षा वाढल्या**

जोडीदाराविषयी आज मुला-मुलींच्या अपेक्षा वाढल्या आहेत. सरकारी नोकरी, देखणेपण, मोठ्या शहरात घर, चारचाकी वाहन अशा अपेक्षा ठेवल्या जातात. नणंद,सासू-सासरे व कुटुंबातील इतर मंडळी नसली तर आणखीच बरे. अशी आशा ठेवून सोयरीकीचा प्रवास सुरु होतो. मुलगा-मुलगी नव्हे तर काही बाबतीत त्यांचे पालकही हाच विचार करताना दिसतात. अपेक्षांचा आलेख वाढतच जात असल्याने सोयरीकीलाही विलंब होत आहे.

■ **समव्यवसायी जोडीदार शोधण्याकडे कल**

समव्यवसायी जोडीदार शोधण्याकडे सर्वांचाच कल आहे. पती-पत्नी दोघेही कमावते असल्यास आर्थिक बाजू मजबूत राहते. एकाच व्यवसायातील असल्यामुळे दोघांमध्ये चांगला समन्वय राहतो. चांगल्या नोकरीचा मुलगा मिळाला नाही तर व्यावसायिक तरुणालाही वर म्हणून पसंती दिली जाते. या सर्व प्रयत्नात अपयश आल्यानंतर मध्यमवर्गीय कुटुंबाकडे पालकांची पावले वळतात.

■ **वडिलधाऱ्यांचा शब्द अडगळीत**

पूर्वी सोयरीक करताना मुला-मुलीचे मत किवा अपेक्षा विचारात घेतल्या जात नव्हत्या. कुटुंबातील ज्येष्ठ मंडळीचा शब्द प्रमाण मानला जात होता. थेट नवरदेव-नवरी म्हणूनच मुलगा-मुलगी मंडपात दाखल होऊन शुभमंगल होत होते. आता प्रत्येक बाबतीत उपवर वधूंच्या अपेक्षा जाणून घेतल्या जातात. दोघांचीही शैक्षणिक पात्रता, कमाईचे माध्यम याविषयी विचार करूनच संबंध जुळविले जातात.

■ **'लिव्ह इन', प्रेमविवाह संस्कृती बोकाळली...**

उच्चभ्रू सोसायटीतील 'लिव्ह इन' संस्कृती सध्या निमशहरी भागात बाळसे धरू लागली आहे तर प्रेमविवाह फॅशन म्हणून अंगिकारले जाऊ लागले आहे; परंतु या दोन्हींचा परिणाम योग्य चाचपणी न करता जोडीदाराची निवड केली तर फसगत होण्याची भीती निर्माण झाली असून यामुळे फार मोठ्या संकटाचा सामना करावा लागल्याची उदाहरणे समोर आली आहेत यामुळे पालकांनीच आपल्या मुलांना योग्य समुपदेशन करून खबरदारी घेण्याची वेळ आली आहे.

# मृणाल दुसानिसने चार वर्षांनी 'त्या' घटनेवर केलं भाष्य



'माझिया प्रियाला प्रीत कळेना' या लोकप्रिय मालिकेतून अभिनेत्री मृणाल दुसानिस घराघरांत पोहोचली. तिच्या सहज-सुंदर अभिनयाने तिने प्रत्येकाच्या मनात एक वेगळी जागा निर्माण केली आहे. काही वर्षांपूर्वी अभिनेता शशांक केतकरबरोबर मृणालने 'सुखांच्या सरींनी हे मन बावरे' या मालिकेत मुख्य भूमिका साकारली होती. या मालिकेचं दिग्दर्शन प्रसिद्ध दिग्दर्शक-निर्माता मंदार देवस्थळीने केलं होतं. यावेळी वाहिनीचा उत्तम आधार असूनही दिग्दर्शकाने कलावंतांचे पैसे चुकवले असा आरोप मंदार देवस्थळींवर करण्यात आला होता. मृणालसह शर्मिष्ठा राऊत, शशांक केतकर, विदिशा म्हसकर यांनी यासंदर्भात पोस्ट शेअर केली होती. याबाबत अभिनेत्रीने नुकत्याच एका मुलाखतीत भाष्य केलं आहे.

मृणाल दुसानिसला घडल्या प्रकाराबद्दल विचारलं असता, अभिनेत्री सेलिब्रिटी कट्टाला दिलेल्या मुलाखतीत म्हणाली, त्या घटनेबद्दल आता बोलून खरंतर काहीच फायदा नाही. कारण, जो काही फायदा व्हायचा होता तो तेव्हा होणं गरजेचं होतं. मी त्या मालिकेत अतिशय मनापासून काम केलं होतं. त्यामुळे मी थोडीशी हळवी झाले होते. मी फारच नाजूक मनस्थितीत होते कारण, सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट शेअर करणं हा माझा स्वभाव कधीच नव्हता.

मृणाल दुसानिस पुढे म्हणाली, कलाकारांचं कसं असतंकाम सुरूये तोपर्यंत त्यांना पैसे मिळत असतात एकदा काम संपलं की, पुढचं काम मिळेपर्यंत सगळं नियोजन करावं लागतं. माझ्या तेव्हा इन्व्हेस्टमेंट वगैरे काहीच नव्हत्या. जेव्हापासून मला कळू लागलं तेव्हापासून माझा खर्च मी करते. तेव्हा माझ्या वडिलांचे शेवटचे दिवस असूनही मला कुटुंबाला वेळ देता नाही आला. मी व्यवस्थित काम केलं. अशावेळी मोबदला मिळत नाही तेव्हा खरंच वाईट वाटतं. शशांकला त्याने पूर्ण पैसे दिले आता त्याचा फक्त टीडीएस राहिलाय. पण, तुम्ही इतरांना निम्मे तरी पैसे द्यायचे. ते गरजेचे होतं

आता यापुढे काम करताना आर्थिक बाबींवर मी आवर्जुन लक्ष ठेवणार आहे. आता मी इतर बऱ्याच प्रोडक्शन हाऊसबद्दल ऐकलंय अशी परिस्थिती सगळीकडे नसते. मला याआधी काम करूनही असा अनुभव कधीच आला नव्हता. त्यामुळे माझ्यासाठी तो अनुभव प्रचंड शॉकिंग होता. मला अनेकांनी आधीच अलर्ट केलं होतं की, इथे काम करू नकोस पण, मी नाही ऐकलं. ही एक गोष्ट सोडली तर, तो उत्तम दिग्दर्शक आहे. माझी पहिली ऑडिशन त्यानेच घेतली होती. यापुढे, त्याच्याबरोबर प्रोडक्शन म्हणून मी काम करू शकणार नाहीमला भीतीच वाटले. पण, याव्यतिरिक्त दिग्दर्शक म्हणून सांगायचं झालं, तर तो ग्रेटच आहे. असं मृणाल दुसानिसने सांगितलं.

# राज व शिल्पाच्या मालमत्तेवर टाच



आर्थिक फसवणूकप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) गुरुवारी उद्योगपती राज कुंद्रा आणि त्यांची पत्नी अभिनेत्री शिल्पा शेट्टी यांच्याशी संबंधित ९७ कोटी ७९ लाखांची मालमत्ता तात्पुरती जप्त केली आहे. यात शिल्पा शेट्टीच्या नावावर असलेली मुंबईच्या जुहू परिसरातील सदनिका आणि पुण्यातील बंगल्याचा समावेश आहे.

एका बिटकॉइन कंपनीच्या माध्यमातून झालेल्या आर्थिक फसवणुकीशी संबंधित 'ईडी'ने ही कारवाई केली आहे. एका बिटकॉइन कंपनीच्या नावाने संकेतस्थळ बनवून अनेकांची कोट्यवधींची फसवणूक झाली होती. पुणे पोलिसांनी कोट्यवधीच्या बिटकॉईन गैरव्यवहारप्रकरणी अमित आणि विवेक भारद्वाज बंधूंना अटक केली होती. त्यांच्यावर आठ हजार गुंतवणूकदारांची दोन हजार कोटींची फसवणूक केल्याचा आरोप होता.

त्यानंतर 'ईडी'ने याप्रकरणी आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्यानुसार (पीएमएलए) गुन्हा नोंदवून तपास सुरू केला होता. या प्रकरणाशी राज कुंद्रांचे संबंध असल्याचे धागेदोरे तपासात उघड झाले होते. याप्रकरणी कुंद्रा यांची चौकशीही करण्यात आली होती. २०२१ मध्ये पोर्नोग्राफी प्रकरणात कुंद्रा यांचे नाव समोर आले होते. या प्रकरणात कुंद्रा यांना अटक झाली होती. काही महिन्यांनंतर त्यांची जामिनावर सुटका झाली होती.

# चांगल्या माझ्या नवऱ्याने मला रामायण अन् अमर चित्रकथा भेट दिली;
# यामीने शेअर केला प्रेग्नेंसीचा प्रवास



काही महिन्यांपूर्वी यामीने ती गरोदर असल्याची बातमी सगळ्यांसोबत शेअर केली होती. याचदरम्यान तिचा आर्टिकल ३७० हा सिनेमाही प्रेक्षकांच्या भेटीस आला.

यामीला तिच्या या अनुभवाबद्दल विचारले असताना ती म्हणाली, माझं संपूर्ण कुटूंब आता मुंबईत आलं आहे. माझी बहीण सुरीली लवकरच मुंबईत येणार आहे. आम्ही फार पारंपरिक विचारांचे आहोत. त्यामुळे अजून आम्ही मुलाची रूम तयार केली नाहीये. अर्थात आम्ही काही बदल केले आहेत. कारण आपल्याला अर्थात तयारी करावी लागते. बाळाच्या सुरक्षिततेसाठी घरात बदलायच्या गोष्टी अर्थात आम्ही त्याच्या जन्मानंतर करू.

माझी बहीण जी आईसुद्धा आहे ती कायमच म्हणते की सगळ्यात उत्तम काळ आहे. मला माहित आहे कि या काळात खूप आव्हानही असतात पण तुम्ही प्रत्यक्ष अनुभवल्याशिवाय तुम्हाला यातील मजा काळात नाही. आम्ही खूपच उत्सुक आहोत. माझा नवराही खूप उत्सुक आहे. आम्ही खूप चर्चा करतो. तो मला उपयोगी पडतील अशा गोष्टी पाठवतो. त्याने माझ्यासाठी अमर चित्रकथा, रामायण ही पुस्तकं वाचायला आणली आहेत. माझ्यावेळी आणि माझ्या बहिणीवेळी जेव्हा माझी आई गरोदर होती तेव्हा ती ही पुस्तकं वाचायची, असं यामी म्हणाली.

काही महिन्यांपूर्वी यामीने ती गरोदर असल्याची बातमी सगळ्यांसोबत शेअर केली होती. याचदरम्यान तिचा आर्टिकल ३७० हा सिनेमाही प्रेक्षकांच्या भेटीस आला. या सिनेमाने चित्रपटगृहात नुकतेच पन्नास आठवडे पूर्ण केले. याबाबतही ती खूप आनंदी असल्याचं तिने शेअर केलं आणि तिच्या टीमला या यशासाठी शुभेच्छाही दिल्या.

यामीने दिग्दर्शक आदित्य धरसोबत २०२१मध्ये लग्नगाठ बांधली. हिमाचल प्रदेशातील पारंपरिक पद्धतीने त्यांचं लग्न पार पडलं. त्यांच्या लग्नाचे फोटोज सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. तिने आणि आदित्यने 'उरी' या सिनेमात एकत्र काम केलं होतं. हा सिनेमा सुपरहिट झाला होता. यामीने या सिनेमात साकारलेली रॉ एजंटची भूमिका चांगलीच गाजली होती.

# सलमान साठी जीव द्यायला तयार असणाऱ्या शेराचा पगार किती?



बऱ्याचदा बॉलीवूडचा भाईजान सलमान खान त्याच्यासोबत सतत सावलीसारखा असणाऱ्या शेराची गोष्ट अनेकांना माहिती नाही.

बऱ्याचदा बॉलीवूडचा भाईजान सलमान खान त्याच्यासोबत सतत सावलीसारखा असणाऱ्या शेराची गोष्ट अनेकांना माहिती नाही. सलमानचा अंगरक्षक म्हणून शेरावर चित्रपटही आला होता. त्याला चाहत्यांचा मोठा प्रतिसादही मिळाला. सलमानवर भावासारखं प्रेम करणाऱ्या शेराचा प्रवास मोठा कष्टाचा होता. एका मुलाखतीमध्ये त्यानं त्याविषयी सांगितलं होतं.

सलमानचा बॉडीगार्ड शेरा हा आता एक मोठा सेलिब्रेटी झाला आहे. त्याचा सोशल मीडियावर हजारोंच्या संख्येनं चाहतावर्ग आहे. त्याला इंस्टावर फॉलो करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. सलमानवर जेवढे चाहते प्रेम करतात तितकचं जास्त प्रेम त्याच्या बॉडीगार्डवर म्हणजे शेराला देखील त्यांच्याकडून मोठी पसंती मिळत असल्याचे दिसून आले आहे. शेराचं खरं नाव गुरमित सिंह जॉली असे आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सलमानचा सुरक्षारक्षक म्हणून शेराचा वर्षाला दोन कोटी रुपये घेतो.

महिन्याला त्याला मिळणारा पगार हा १६ लाख रुपये आहे. शीख परिवारातून आलेल्या शेराची प्रकृती ही लहानपणापासूनच सुदृढ राहिली आहे. त्याची १९८७ साली ज्युनिअर मिस्टर मुंबई, त्याच्या पुढच्या वर्षी मिस्टर महाराष्ट्र म्हणून निवड झाली होती. त्यानंतर शेराच्या वडिलांनी त्याला मुंबईला बोलावून घेतले. तिथे तो गॅरेजमध्ये काम करत होता.

१९९५ मध्ये सोहेल खाननं सलमान खानच्या विदेशी दौऱ्यासाठी शेराच्या कंपनीकडे सुरक्षेसाठी मागणी केली होती. त्यानंतर सोहेलनं शेराला विचारलं होतं की, भाईची साथ कधीही सोडणार नाहीस ना? शेरानं संमती दिली होती. एकदा सलमानला एका शोमध्ये जायचे होते त्यावेळी सोहेलनं शेराला सांगितले. तेव्हापासून तो नेहमीच सलमानच्या अवती भवती राहत असल्याचे दिसून आले आहे.

सलमानला शेराचे काम आवडल्यानं त्यानं त्याला नेहमीच आपल्या सुरक्षारक्षकाचे काम दिले. आता तो त्यांच्या कुटूंबातीलच एक सदस्य आहे. शेरा हा एक सिक्योरिटी कंपनी देखील चालवतो. त्याचे नाव टायगर सिक्योरिटी असे आहे.

जी सेलिब्रेटींना सुरक्षा देण्याचे काम करते. एका मुलाखतीमध्ये शेरानं सांगितले होते की, सलमान हा माझ्यासाठी खूप काही आहे. त्याच्यासाठी जीव द्यायलाही तयार होईल. त्यानं माझ्यावर खूप प्रेम केले आहे. भरभरून दिले आहे. वीस वर्षांपासून मी त्याला ओळखतो आहे.

# आलिया भट्टचा टाईम मॅगझिनच्या सर्वात प्रभावशाली १०० व्यक्तींच्या यादीत समावेश

टाईम मॅगझिनच्या २०२४ मधील १०० सर्वात प्रभावशाली व्यक्तींच्या यादीत समाविष्ट झाल्यानंतर आलिया भट्टला आकाश ठेंगणे झाले आहे. ब्रिटीश लेखक आणि दिग्दर्शक टॉम हार्पर यांनीही आलियाचे तिच्या कामाच्याप्रती असलेल्या श्रद्धेबद्दल कौतुक केलेय. अलिकडेच आलियाने टॉम हार्पर दिग्दर्शित 'हार्ट ऑफ स्टोन' या चित्रपटातून हॉलीवूडमध्ये पदार्पण केलं होतं. यातील तिच्या भूमिकेच जगभर कौतुक झाले होते.

टॉम हार्परने लिहिलेल्या मासिकाच्या लेखात आलियाचा उल्लेख ''खरोखरची आंतरराष्ट्रीय स्टार'' असा केला आहे. ''मी आलियाला तिच्या हॉलीवूड पदार्पण असलेल्या हार्ट ऑफ स्टोनच्या सेटवर भेटलो. ती खोडकर असल्याचे ऐकले होते पण सेटवर काम करताना मला ती नम्र आणि विनोदी वाटली. ती शिस्तबद्ध असल्याने आणि तिच्याकडे ग्रहण करण्याची शक्ती असल्याने याचे प्रतिबिंब कामात उमटल्याचे दिसले. ती संधीचा लाभ घेताना कचरत नाही.''

टॉम हार्पर पुढे म्हणाले, ''आलियाची सुपरपॉवर ही तिची सत्यता, संवेदनशीलता आणि चुंबकीय फिल्म स्टार म्हणून मेळ घालण्याची क्षमता तिच्याकडे आहे. एक अभिनेत्री म्हणून, ती चमकदार आहे आणि एक व्यक्ती म्हणून ती खऱ्या अर्थाने विश्वासार्ह आणि सर्जनशील आंतरराष्ट्रीय स्टार आहे.''

टाईम मॅगझिनच्या १०० सर्वात प्रभावशाली व्यक्तींमध्ये समावेश होणं हे सन्मानाचं असल्याचे आलियाने म्हटलेय. तिने एक क्लिप शेअर करुन दिग्दर्शक टॉम हार्पर यांनी केलेल्या कौतुकाबद्दल त्यांचे आभार मानले आहेत. संजय लीला भन्साळी दिग्दर्शित 'गंगूबाई काठियावाडी' या चित्रपटातील भूमिकेसाठी आलियाने गेल्या वर्षी राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारासह अनेक महत्त्वपूर्ण पुरस्कार जिंकले होते.

टाईम मॅगझिनच्या प्रभावशाली १०० व्यक्तींमध्ये आलिया भट्टशिवाय भारतीय वंशाचा अभिनेता देव पटेल आणि कुस्तीपटू साक्षी मलिक यांचाही समावेश करण्यात आलाय. कामाच्या आघाडीवर आलियानं अलीकडेच करण जोहर दिग्दर्शित 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' मध्ये भूमिका केली होती. आगामी काळात तिच्याकडे वासन बालाचा 'जिगरा' हा चित्रपट आहे. या चित्रपटाची ती सह-निर्माती देखील आहे.

# तारक मेहता फेम अभिनेत्रीवर कोसळला दु:खाचा डोंगर, बहिणीच्या निधनानंतर शेअर केली भावनिक पोस्ट



'तारक मेहता का उल्टा चष्मा' या कार्यक्रमातून प्रेक्षकांच्या भेटीला आलेली अभिनेत्री जेनिफरवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. मागील बऱ्याच काळापासून तिची बहिण आरोग्याच्या समस्येने ग्रस्त होती. तसेच त्यानंतर आता तिने १३ एप्रिल रोजी शेवटचा श्वास घेतला असल्याचं यावेळी जेनिफरने सांगितलं आहे. जेनिफरने यावेळी तिच्या बहिणीच्या आठवणीत एक भावनिक पोस्ट शेअर केली आहे.

सध्या जेनिफर तिच्या आयुष्यात अनेक कठिण प्रसंगातून जात आहे. त्याचप्रमाणे तिने तारक मेहता या मालिकेचे निर्माते आसितकुमार मोदी यांच्यावर लैंगिक शोषणाचे आरोप केले होते. तसेच तिच्या भावाचे देखील काही दिवसांपूर्वी निधन झाले, त्यामुळे मागील काही दिवसांपासून जेनिफरच्या वैयक्तिक आयुष्यात बऱ्याच अडचणी येत असल्याचं पाहायला मिळतेय.

**जेनिफरने पोस्टमध्ये काय म्हटले?**

जेनिफरने तिच्या सोशल मीडियाच्या अकाऊंटवरुन तिच्या बहिणीसाठी पोस्ट केली होती. यावेळी तिने त्या पोस्टमध्ये म्हटलं की, माझी बहिण डिंपल, तुझ्याशिवाय आयुष्याची कल्पनाच करता येणार नाही. तु आम्हाला आयुष्यातला प्रत्येक क्षण आनंदात आणि चेहऱ्यावर हसू ठेवून कसा जगावा हे शिकवलेस.

मागील दीड वर्ष बेताची - जेनिफर

दरम्यान जेनिफरने काही दिवसांपूर्वी टाईम्ससोबत बोलताना म्हटले की, मी मागील दीड वर्षापासून बराच संघर्ष करतेय. माझ्या धाकट्या भावाच्या मृत्यूनंतर मी माझ्या माहेरच्या सात मुलींचा सांभाळ करत आहे. यावेळी असित मोदी प्रकरण घडले. सर्व गोष्टी एकत्र सांभाळणे माझ्यासाठी खूप अवघड होते. त्यामुळे गेले काही महिने माझ्यासाठी त्रासदायक होते. तसेच तारक मेहता ही मालिका सोडल्यानंतर जेनिफरला कोणताही रोल मिळाला नसल्याचे तिने म्हटले. पण असे एक प्रोडक्शन हाऊस आहे, ज्यांना माझासारख्या पात्राची गरज आहे. ते लोक मला अप्रोच करु शकतात.

काही दिवसांपूर्वी जेनिफरने 'तारक मेहता का उल्टा चष्मा'चे निर्माते आसितकुमार मोदी यांच्याविरोधातला खटला जिंकला होता. त्या प्रकरणात न्यायालयाने आसितकुमार मोदी यांना ५ लाखांचा दंड ठोठावला होता. पण अद्याप त्यांनी जेनिफरला नुकसान भरपाई दिली नसल्याची माहिती समोर आलीये. पण अद्यापही आसितकुमार मोदी किंवा त्यांच्या टीमकडून यावर कोणत्याही प्रकारचं भाष्य करण्यात आलं नाहीये.

# दिव्यांका त्रिपाठीचा अपघात : उंचीवरुन पडल्याने हाताची दोन हाडं मोडली, पती विवेकने सोशल मीडियावर दिले हेल्थ अपडेट





टेलिव्हिजन अभिनेत्री दिव्यांका त्रिपाठी उंचीवरून पडली आहे. दिव्यांकाला जबर दुखापत झाली असून तिच्या हातातील दोन हाडंही तुटली आहेत. तिचे पती विवेक दहिया यांनी सोशल मीडियावर ही माहिती दिली आहे.

त्याने त्याच्या इंस्टाग्राम स्टोरीमध्ये लिहिले की, दिव्यांका बरी होत आहे. काल संध्याकाळी ती उंचीवरून पडल्याने तिच्या हातातील दोन हाडे तुटली. यानंतर तिच्यावर तातडीने शस्त्रक्रिया करण्यात आली. दिव्यांकाला वेदना होत आहेत, पण तुमच्या प्रेमामुळे आणि प्रार्थनांमुळे ती बरी होईल. मी तुम्हा सर्वांना विनंती करतो की यावेळी आमच्या कुटुंबासाठी गोपनीयता ठेवा.

विवेक दहियाच्या इंस्टाग्राम पोस्टमध्ये त्याने दिव्यांकाच्या आरोग्याविषयी अपडेट दिले आहे.

या वर्षात दिव्यांका दुसऱ्यांदा जखमी झाली आहे. काही महिन्यांपूर्वी तिच्यावर लिगामेंटची शस्त्रक्रिया झाली होती, त्यानंतर ती बेड रेस्टवर होती. याची माहिती दिव्यांकाने सोशल मीडियावर दिली होती. ९ एप्रिल रोजी, तिने इन्स्टाग्रामवर लिगामेंट सर्जरीपासून रिकव्हरीपर्यंतचा तिचा प्रवास शेअर केला.

दिव्यांका त्रिपाठीचे नाव टॉप टीव्ही अभिनेत्रींच्या यादीत समाविष्ट आहे. 'ये है मोहब्बतें', 'बनू मैं तेरी दुल्हन', 'चिंटू चिंकी आणि एक बडी सी लव्ह स्टोरी' यांसारख्या अनेक मालिकांमध्ये तिने मुख्य भूमिका साकारल्या आहेत.